POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०५ ● अंक-१३१ ● मुंबई, शनिवार, १३ डिसेंबर २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

### १३ जिल्ह्यांना थंडीमुळं अलर्ट!

केंद्रीय हवामानशास्त्र विभागाच्या माहितीनुसार १२ डिसेंबरपासून उर्वरित डिसेंबर महिन्यासाठी राज्यातील १३ जिल्ह्यांना थंडीची लाट आणखी तीव्र होणार असल्याचा इशारा देत नागरिकांनी यादरम्यान आरोग्याची काळजी घ्यावी असा इशारा देण्यात आला आहे. मध्य महाराष्ट्र, विदर्भासह मराठवाड्यात हा कहर अधिक पाहायला मिळेल, त्यामध्ये पुढील २४ तास अधिक थंड असतील हा इशारा जारी करण्यात आला आहे. विदर्भात प्रामुख्यानं वर्धा, नागपूर, गोंदियामध्ये थंडीचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. जिथं नागपूरमध्ये पारा ९ ते ११ अंशांदरम्यान असेल तर अमरावतीतही अशीच थंडी नागरिकांना घरात डांबून ठेवताना दिसेल. दरम्यानच्या काळात ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांची विशेष काळजी घेत आरोग्य सांभाळण्याच्या सूचना करण्यात आल्या आल्या आहेत.

## राज्यात 'जीवघेणी' थंडी, गारठून तिघांचा मृत्यू

# हवामान विभागाकडून १३ जिल्ह्यांसाठी दक्षतेचा इशारा!

■ **बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक,**

हवामान विभागानं पुढील दोन दिवसांसाठी विदर्भ, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्याला थंडीचा यलो अलर्ट जारी केला असून, त्यामुळं सामान्य जनजीवनावरसुद्धा आता या कडाक्याच्या थंडीचा परिणाम होताना दिसत आहे. इतकंच नव्हे, तर राज्यातील थंडीची लाट 'जीवघेणी' ठरत असल्याची भीतीसुद्धा व्यक्त केली जात आहे.

**विदर्भात तीन मृत्यूंची नोंद**

विदर्भात थंडीची तीव्रता वाढली असून उघड्यावर झोपणाऱ्यांना बेघर नागरिकांचा या थंडीच्या माऱ्यामुळं मृत्यू ओढावल्याची शंका वर्तवण्यात येत आहे. सदर घटनांविषयी पोलिसात आकस्मिक मृत्यूची नोंद, करण्यात आली असून अंतिम अहवाल आल्यावर मृत्यूचं कारण स्पष्ट होणार असल्याचं सांगण्यात येत आहे. मागील २४ तासांत ३ ज्येष्ठ व्यक्ती मृत्य झाल्याची नोंद विदर्भात झाली असून थंडीने गारठल्यामुळं मृत्यू झाल्याची प्राथमिक शंका व्यक्त केली जात आहे. तर, डेथ ऑडिट रिपोर्ट अर्थात मृत्यूचा अंतिम अहवाल येणे बाकी आहे. एमआयडीसी, पाचपावली आणि वाडी पोलीस हद्दीत तिघांचा मृत्यू झाल्याची माहिती मिळाली. वाडी पोलीस स्टेशन हद्दीत श्रीकृष्ण रुग्णालयाशेजारी ६५ वर्षीय व्यक्ती बेशुद्ध अवस्थेत आढळली. त्यानंतर मेडिकलमध्ये त्यांना मृत घोषित करण्यात आलं. पाचपावली पोलीस स्टेशन हद्दीत मेट्रो पिलरखाली ६५ वर्षीय पुरुष निपचित अवस्थेत आढळला असता त्यांना डॉक्टरांकडे नेण्यात आलं जिथं त्यांना मृत घोषित करण्यात आलं. तर, एमआयडीसी पोलीस स्टेशन हद्दीत बोस्टन कॅफेसमोर गॅरेजजवळ ज्येष्ठ नागरिक बेशुद्ध झाल्याचं दिसून आलंय त्यांना एम्समध्ये नेलं असता तिथं मृत घोषित करण्यात आलं. तिन्ही मृतांची ओळख अद्याप पटलेली नाही नसून मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आल्याचं कळत आहे.




## महाराष्ट्रावर आता पुन्हा मोठं संकट

### धोका वाढला, आयएमडीकडून जिल्ह्यांना मोठा इशारा

■**मुंबई। प्रतिनिधी,**

महाराष्ट्रात यंदा पावसानं चांगलाच धुमाकूळ घातला होता, पावसामुळे राज्यात प्रचंड नुकसान झालं. अतिवृष्टीचा मोठा तडाखा महाराष्ट्राला बसला. अतिवृष्टीमुळे खरीप हंगाम पूर्णपणे शेतकऱ्यांच्या हातून गेला, तर काही ठिकाणी नद्यांना आलेल्या पुराचं पाणी घरांमध्ये घुसल्यामुळे घरादारासहीत पशुधन देखील वाहून गेल्यानं शेतकऱ्यांचा संसार उघड्यावर आला. मोसमी पावसासोबतच अवकाळी पावसाचं प्रमाण देखील अधिक राहिल्याचं पहायला मिळालं. यंदा देशासह राज्यात मान्सूनने वेळेपूर्वीच एन्ट्री केली होती. दरम्यान आता पावसाचा धोका टळला आहे, मात्र पुन्हा एकदा एक मोठं संकट राज्यावर येणार आहे. या पार्श्वभूमीवर आयएमडीकडून राज्यातील जिल्ह्यांना हायअलर्ट जारी करण्यात आला आहे.

**थंडीचा परिणाम कोणत्या जिल्ह्यावर होणार?**

- **मराठवाडा** – जालना, परभणी, बीड, नांदेड आणि लातूर जिल्हा
- **विदर्भ** – गोंदिया, नागपूर
- **उत्तर महाराष्ट्र** – नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव, अहमदनगर
- **पश्चिम महाराष्ट्र** – पुणे, सोलापूर या जिल्ह्यांना हवामान विभागाकडून थंडीचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.

**सतर्कतेचं आवाहन**

दरम्यान महाराष्ट्रात पुन्हा एकदा थंडीचा कडका वाढणार आहे, उत्तरेकडील थंड वाऱ्यामुळे तापमान घसरणार आहे, या पार्श्वभूमीवर हवामान विभागाकडून सतर्कतेचं आवाहन करण्यात आलं आहे. ज्या लोकांना श्वासनाचा त्रास आहे, अशा लोकांनी विशेष काळजी घ्यावी असं हवामान विभागानं म्हटलं आहे. दरम्यान दुसरीकडे महाराष्ट्रासोबतच उत्तर भारतात देखील थंडीचा कडका आता वाढणार आहे. पुढील काही दिवस तापमानात चांगलीच घट होणार असून थंडीचा कडाका कायम राहण्याचा अंदाज आहे. त्यामुळे महाराष्ट्र गारठण्याची शक्यता आहे.

### काय आहे हवामान विभागाचा नवा अंदाज?

महाराष्ट्रात पुढील २ दिवसांमध्ये सरासरी सामान्य तापमानापेक्षा कमी तापमान असणार आहे. उत्तरेकडील थंड वारे वेगाने वाहत असल्याने पुढील 48 तासांमध्ये महाराष्ट्रात थंडी वाढणार आहे. महाराष्ट्रात थंडीच्या लाटेचा इशारा हवामान विभागाकडून देण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर हवामान विभागाकडून राज्यातील 14 जिल्ह्यांना येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. यासंदर्भात हवामान विभागाच्या वैज्ञानिक सुषमा नायर यांनी माहिती दिली.

## मंदिर-दर्गा-दिवा, संसद ते विधिमंडळ

# उद्धव ठाकरे अन् अमित शाहांमधील वाद नेमका काय?

■**मुंबई। प्रतिनिधी,**

दक्षिण भारतातील कार्तिकेय स्वामीच्या एका मंदिरावरुन हिंदू मुस्लिम वादाचं राजकारण सुरू झालं असून दिल्लीतील संसद आणि महाराष्ट्रातील विधिमंडळ सभागृहातही या वादाचे पडसाद उमटले. या वादात केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी थेट उद्धव टाकरेंचं नाव घेऊन त्यांना टोला लगावला. त्यानंतर, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अमित शाहांच्या भाषणातील तो व्हिडिओ शेअर करत उद्धव ठाकरेंना डिवचलं. मग, फडणवीसांनी डिवचल्यानंतर शांत बसतील ते ठाकरे कसले? उद्धव ठाकरेंनी नागपूरच्या विधिमंडळातून अमित शाह आणि देवेंद्र फडणवीस यांच्यावर ठाकरे शैलीत पलटवार केला.

दक्षिण भारताच्या तामिळनाडूतील मुदराईजवळ असलेल्या कार्तिकेय स्वामीच्या एका मंदिरावरुन सुरु झालेल्या वादाची आग देशाची राजधानी दिल्लीत पोहोचलं. त्यावरुन संसदेत झालेल्या एका भाषणाचा वाद महाराष्ट्राची उपराजधानी नागपूरात पोहोचला, जो वाद आहे एकेकाळच्या मित्रपक्षांमधला. अमित शाह आणि उद्धव ठाकरेंमधल्या ह्या वादावर आज चांगलंच टीका-मंथन झाल्याचं पाहायला मिळालं.

त्याचं झालं असं की, या मंदिराच्या वादात उद्धव ठाकरेंनी घेतलेल्या भूमिकेवर गृहमंत्री अमित शाहांनी संसदेतील भाषणात कठोर टीका केली. अमित शाहांच्या त्या भाषणाची धग तात्काळ महाराष्ट्रात पोहोचली, कारण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी त्याची लिंक आपल्या एक्स अकाऊंटवर पोस्ट केली. ते भाषण शेअर करताना फडणवीसांनी उद्धव ठाकरेंना उद्देशून कॅप्शन दिलं, कोण होतास तू, काय झालास तू. त्यामुळे, अमित शाह आणि फडणवीसांचे ते शब्द ठाकरेंच्या जिव्हारी लागले. विधान परिषदेचे आमदार या नात्यानं उद्धव ठाकरे नागपुरात पोहचता क्षणी अमित शाहांवर अक्षरशः तुटून पडले. अमित शाहांनी मला हिंदुत्व शिकवू नये, अशा भाषेत त्यांनी उत्तर दिलं. एवढंच नाही तर राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर, आणि अमित शाहांच्या लेकावरही उद्धव ठाकरेंनी टीका केली.



### शिंदेंच्या शिवसेनेकडूनही ठाकरे लक्ष्य

मंदिराच्या प्रथेला विरोध करणाऱ्या द्रमुकला पाठींबा दिल्याने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेनं सुद्धा उद्धव ठाकरेंना लक्ष्य केलं. तर, हिंदुत्वावरुन उद्धव ठाकरेंनी अमित शाहांवर बोचरी टीका केल्याने भाजपच्या नेत्यांचंही पित्त खवळलं आणि त्यांनीही ठाकरेंवर प्रहार केले. तामिळनाडू मधील विधानसभा निवडणुका अवघ्या सहा महिन्यांवर आल्या आहेत. त्यामुळे भाजप हिंदू-मुस्लिम वाद भडकवत असल्याचा आरोप द्रमुक नेते करत आहेत. तर स्टॅलिन सरकार हिंदू विरोधी असल्याची टीका भाजप नेते करत आहेत. या वादातील उद्धव ठाकरेंच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत अमित शाहांनी दक्षिणेकडील हा वाद मुंबईपर्यंत आणून ठेवला आहे. त्यावरुन, महाराष्ट्रातील ठाकरे विरुद्ध भाजप-शिवसेना असा सामना रंगला आहे.

### नेमका वाद काय?

तामिळनाडूच्या मुदराईजवळ अरुलमिगू सुब्रमण्य स्वामीचं पंड्याकालीन मंदिर आहे, सहाव्या शतकात म्हणजे इस्लामचा जन्म होण्याआधी या मंदिराची स्थापना झाली आहे. त्याच्या समोरचं तिरुपरनकुंद्रम टेकडीवर कार्तिक दिप प्रज्वलनाची हजारो वर्षांची परंपरा आहे. मात्र, तिथं जुना दर्गा असल्याने या प्रथेला हिंदू-मुस्लिम वादाचं स्वरुप आलंय. दर्ग्याच्या ट्रस्टकडून दीपस्तंभाच्या जागेवर अतिक्रमण होत असल्याचा आरोप केला जातोय. त्यामुळे, अखेर दीप प्रज्वलनाचा वाद कोर्टात पोहोचला. याप्रकरणी, मद्रास हायकोटार्चे जस्टीस जी.आर. स्वामीनाथन यांनी मंदिर समितीला दीप प्रज्वलनास परवानगी दिली. द्रमुकच्या स्टॅलिन सरकारला संबंधित जागेवर आवश्यक ती सुविधा, सुरक्षा देण्याचेही आदेश दिले. मात्र, तणावाचं कारण देत स्टॅलिन सरकारने उच्च न्यायालयाचे आदेश धुडकावले आणि त्याविरोधात सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. स्टॅलिन सरकारने केंद्र सरकार आणि भाजपवर आरोपही केले. तर, ४ डिसेंबरला टेकडीवरील दीपस्तंभाकडे जाणाऱ्या भाविकांना स्थानिक पोलिसांनी मज्जाव केला. त्यानंतर, द्रमुकच्या खासदारांनी जस्टीस स्वामीनाथन यांच्याविरोधात महाभियोगाची नोटीस दिली. लोकसभा अध्यक्षांकडे सादर केलेल्या या महाभियोग प्रस्तावावर (नोटीसवर) १२० खासदारांच्या सह्या आहेत, त्यात उद्धव ठाकरेंचे खासदार अरविंद सावंत यांची सुद्धा सही आहे. त्यामुळे, उद्धव ठाकरे तुम्ही सुद्धा मंदिराच्या प्रथेला विरोध करुन दग्यार्साठी समर्थन करता, असा आरोप करत अमित शाहांनी उद्धव ठाकरेंना लक्ष्य केलं.

## मुंबईतील मशिदींवर पुन्हा भोंगे वाजणार?

### परवानगीसाठी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल

■**मुंबई। प्रतिनिधी,**

मुंबईतील मशिदींवरील भोंग्यांवर राज्य सरकारने केलेली कारवाई अन्यायकारक असून अजानसाठी २४ मशिदींवर पुन्हा भोंगे लावण्याची परवानगी द्या. अशी विनंती करणारी याचिका उच्च न्यायालयात दाखल करण्यात आली आहे. हजरत ख्वाजा गरीब नवाज वेल्फेअर असोसिएशनच्यावतीने दाखल केलेल्या या याचिकेची मुख्य न्यायमूर्ती श्री चंद्रशेखर आणि न्यायमूर्ती गौतम अखंड यांच्या खंडपीठाने दाखल घेत राज्य सरकारला भूमिका मांडणारे प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे आदेश दिले. भोंग्यांच्या आवाजाची पातळी तीव्र असल्याने राज्य सरकारने



मुंबईतील भोंग्यांवर कारवाई केली आहे. या कारवाईमुळे मूलभूत हक्कांचे उल्लंघन होत असल्याचा दावा करत हजरत ख्वाजा गरीब नवाज वेल्फेअर असोसिएशन व मोहम्मद युसूफ अन्सारी यांनी अँड. इम्रान शेख, अॅड. डॉ. सना शेख, अॅड जजीब अझीझ व अॅड शगुफ्ता शेख यांच्यामार्फत याचिका दाखल केली आहे. मालाड, वरळी, लोअर परळ, गोवंडी, मानखुर्द यासह २४ मशिदींवर भोंगे लावण्याची परवानगी देण्यात यावी, अशी मागणी याचिकाकर्त्यांनी केली.

### मुंबई भोंगेमुक्त

दरम्यान, यापूर्वी, विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात विधानसभा सदस्य सुधीर मुनगंटीवार यांनी धार्मिक स्थळांवरील भोंग्याचा मुद्दा लक्षवेधी सूचनेद्वारे उपस्थित केला होता. त्यावेळी, 'राज्यातील आतापर्यंत ३,३६७ धार्मिक स्थळांवरील भोंगे हटविण्यात आले आहेत. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार ही कारवाई करण्यात आली आहे. यात मुंबईतील १,६०८ भोंगे असून त्यात १,१४९ मशिदी, ४८ मंदिरे, १० चर्च, ४ गुरुद्वारा आणि १४७ इतर धार्मिक स्थळांवरील भोंग्यांचा समावेश आहे', असे उत्तर देताना 'मुंबई आता पूर्णपणे भोंगेमुक्त झाली आहे', असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले होते.

## पर्यावरण प्रेमी चिडले, नाशिकच्या तपोवनमध्ये ३०० झाडं तोडली, वृक्ष तोडीला सुरुवात

■**नाशिक। प्रतिनिधी,**

नाशिकच्या तपोवनमध्ये वृक्ष तोडीला सुरुवात झाली आहे. नवीन एसटीपी प्लांटसाठी ३०० झाडांची कत्तल करण्यात आली आहे. पर्यावरणप्रेमींचा विरोध डावलून ही वृक्षतोड करण्यात येत आहे. २०२७ साली नाशिकमध्ये सिंहस्थ कुंभमेळा होणार आहे. त्यासाठी देशभरात लाखो साधू, संत आणि भाविक नाशिकमध्ये एकवटतील. या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या तयारीसाठी तपोवनमध्ये साधुग्राम बांधण्याची योजना आहे. या साधुग्रामसाठी तपोवनमधील जवळपास १८०० झाडं तोडावी लागणार आहेत. पर्यावरणप्रेमींचा या वृक्षतोडीला विरोध आहे. पण सरकार आपल्या निर्णयावर ठाम आहे. प्रसिद्ध अभिनेते सयाजी शिंदे यांनी तपोवनला भेट देऊन वृक्ष तोडीला विरोध केला. या मुद्यावर ते मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांना सुद्धा भेटले.

मागच्या अनेक दिवसांपासून या वृक्ष तोडीला पर्यावरण प्रेमी विरोध करत आहेत. पण सरकारने आजपासून ही वृक्षतोड सुरु केली आहे. त्यामुळे पर्यावरणप्रेमींमध्ये संतापाची लाट उसळली आहे. साधुग्रामच्या १८०० झाडांचा प्रश्न अनुत्तरित असताना एसटीपी प्लांटसाठी झाडांची कत्तल केल्याचा पर्यावरण प्रेमींचा आरोप आहे. आगामी कुंभमेळ्याच्या अनुषंगाने शहरात नवीन एसटीपी प्लांट उभारण्यात येणार आहे.




याच प्रकल्पासाठी झाडांची कत्तल केल्याचा आरोप आहे. ४४७ झाडांना तोडण्याची रीतसर परवानगी असल्याचा पालिका प्रशासनाचा दावा आहे. तपोवन परिसरात उभारला जाणारा नवीन एसटीपी प्लांट वादात सापडला आहे. तपोवनातील साधुग्रामसाठी टीडीआरद्वारे भूसंपादनास शेतकऱ्यांचा ठाम विरोध. बाजारभावानुसार फक्त रोखीने मोबदला देण्याची जागामालक आणि शेतकऱ्यांची मागणी. महापालिकेचा ५० टक्के टीडीआर आणि ५० टक्के रोख रक्कमेचा प्रस्ताव शेतकऱ्यांनी धुडकावला. आरक्षण ३७७ एकरांवरून १२०० एकरांपर्यंत वाढवण्यालाही शेतकऱ्यांचा तीव्र विरोध. महापालिका आयुक्त मनिषा खत्री यांच्याकडून वाटाघाटींचे आश्वासन.

**नाशिकसाठी येणार १५००० झाडं**

हैदराबाद वरून नाशिकसाठी येणार १५००० झाडं. आलेल्या झाडांच्या रोपांसाठी पर्यावरण प्रेमी आणि महापालिका अधिकाऱ्यांकडून पाहणी सुरू. पेलिकन पार्क आणि गंगापूर रोड व्यतिरिक्त गोदावरी, नंदिनी,कपिला नद्यांच्या तीरावर देखील जागांचा शोध सुरू. नद्यांच्या किनाऱ्यावर आलेल्या झाडांचे रोपण झाल्यास पर्यावरण राखण्यास मदत होईल असा पर्यावरण प्रेमींचा दावा. महापालिका वन विभागाचे अधिकारी, पर्यावरण प्रेमी यांची संयुक्त पाहणी सुरू.

## गाडीच्या डिकीतून २.२३ लाखांची चोरी पोलिसांना फिर्याद देणाऱ्यालाच बेड्या

■**काशिगांव। प्रतिनिधी,**

दोन इसमांनी पोलिस असल्याची बतावणी करुन फिर्यादी यांचे २,२३,०००/ रक्कम गाडीच्या डिक्कीमधुन काढुन घेतले अशी फिर्याद देणाराच निघाला आरोपी, फियार्दी यांस अटक करुन फसवणुकीचे २,२३,०००/रुपये हस्तगत करण्यात यश.- गुन्हे प्रकटीकरण कक्ष, काशिगांव पोलीस ठाणे यांची कामगिरी.



अधिक माहितीनुसार दिनांक ०८/१२/२०२५ रोजी तक्रारदार सुशांत दशरथ मोहीते, वय ३६ वर्ष, व्यवसाय कन्स्ट्रक्शन सुपरवाईडार, रा. रुन नं. ५११ भिमनगर वर्तकनगर कोकाटे चाळ गणपती मंदीर जवळ, ता. जि. ठाणे यांनी काशिगांव पोलिस स्टेशन येथे तक्रार दिली कि, दिनांक ०८/१२/२०२५ रोजी ०१.०० वा. च्या सुमारास तक्रारदार हे त्यांच्या दुचाकीने घोडबंदर रोड, काजुपाडा येथुन जात असतांना चेनागांव सिग्नल जवळ नाकाबंदी करिता उभ्या असलेल्या खाकी गणवेशातील दोन पोलिसांनी तक्रारदार यांची गाडी रोखुन त्यांच्याकडे गाडीचे कागदपत्रे व परवाना इत्यादी बाबत विचापुस केली असता फियार्दी यांनी त्यांना त्यांचे गाडीचे कागदपत्रे व लायसन दाखविल्यानंतर त्या दोन पोलिसांनी गाडीची डिक्की चेक केली असता, डिक्की मध्ये फियार्दी यांना त्यांच्या कंपनीचे मालक रामचंद्र सत्रे यांनी कंपनीच्या साईटवर कामगारांना देण्याकरिता सदर रक्कम दिली असल्याचे सांगितले त्यावेळी त्या दोन पोलिसांनी गाडीच्या डिक्कीमधील २,२३,०००/रुपये इतकी रक्कम काढुन घेवून " निवडणुका चालु आहे तुम्ही ऐवढी रक्कम कोठुन आणली व कोठे देणार आहे? या बाबत खुलासा करण्याकरिता काशिमिरा पोलिस स्टेशन येथे या" असे सांगितले त्यावेळी फिर्यादी यांनी त्या दोन पोलिसांना समजवण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी फिर्यादी यांना मारहाण करुण सदर रक्कम घेवुन ते दोन पोलिस त्या ठिकाणाहुन निघुन गेले अशी हकीगत तक्रारदार यांनी काशिगांव पोलिस स्टेशन येथे येवुन सांगितली. तक्रारदार यांच्या तक्रारीवरुन लागलीच त्या दोन तोतया पोलिसांविरुद्ध काशिगांव पोलिस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला होता. नमुद गुन्ह्याचा प्रकार गंभीर स्वरुपाचा असल्याने वरिष्ठांनी सदर घटनेची खात्री करुन आरोपींचा शोध घेवुन त्यांना अटक करण्याच्या सुचना काशिगांव पोलिस स्टेशनला दिल्या होत्या.

नमुद गुन्ह्याच्या तपासात घटनास्थळावर व फिर्यादी यांच्याकडे कौशल्यपूर्ण केलेल्या तपासात नमुद गुन्हा फिर्यादी सुशांत मोहिते यांनीच तो काम करत असलेल्या सत्रे कन्स्ट्रक्शन कंपनीच्या पैश्याचा अपहार करण्याकरिता वरिल नमुद योजना आखून केला असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. कन्स्ट्रक्शन नमुद गुन्ह्यात फिर्यादी १) सुशांत दशरथ मोहीते, व त्याचा साथीदार २) राणु उर्फ ओंकार अंकुश भदर्ग, वय २९ वर्ष, व्य नोकरी, रा. ०३ अप्पा इंदिसे चाळ, शास्त्रानगर, पोखरण रोड ०१ जि ठाणे यांना अटक करण्यात आली असुन अटक आरोपींकडुन नमुद गुन्ह्यातील २,२३,०००/रु. रोख रक्कम व गुन्ह्यात वापरलेले वाहन हस्तगत करण्यात आले आहे.

सदरची कामगिरी मा. श्री. निकेत कौशिक, पोलिस आयुक्त, मा. श्री. दत्तात्रय शिंदे, अपर पोलिस आयुक्त, मा. श्री. संदिप डोईफोडे, पोलिस उप आयुक्त (गुन्हे) अतिरिक्त प्रभार परिमंडळ ०१, श्री. गणपत पिंगळे, सहायक पोलिस आयुक्त, मिरारोड विभाग, यांच्या मार्गदर्शनाखाली राहुलकुमार पाटिल, वरिष्ठ पोलिस निरीक्षक, काशिगांव पोलिस स्टेशन, संजय पुजारी, पोलिस निरीक्षक (गुन्हे) अभिजीत लांडे, विजय साठे, पोलिस उप निरीक्षक, गुन्हे प्रकटीकरण शाखा, तसेच गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अंमलदार पो. हवा/प्रताप पांचुदे, पो.हवा/जयप्रकाश जाधव, पोलीस अंमलदार/ किरण विरकर, विक्रांत खंदारे, उमंग चौधरी, प्रविण टोबर, नामदेव देवकाते, अभिषेक मडाची यांनी केली आहे.

## पोलीस खात्यात कोट्यावधींचा घोटाळा?

### पोलीस अधीक्षक कार्यालयातच भ्रष्टाचार केल्याचा आरोप

■**रायगड। प्रतिनिधी,**

रायगड जिल्ह्यात पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या लेखा शाखेत भ्रष्टाचाराचं धक्कादायक प्रकरण समोर आलं आहे. आरोपी राजेश राम जाधव, कनिष्ठ श्रेणी लिपीक, यांनी सन २०२१ पासून चाललेल्या त्यांच्या नेमणुकीत शासकीय निधीचा मोठ्या प्रमाणावर अपहार केला असल्याचा आरोप आहे.

या घोटाळ्याची रक्कम एकूण अंदाजे १ कोटी ७८ लाख २९ हजार ३०० रुपये आहे. ज्यामध्ये आरोपी यांची पत्नी रिया राजेश जाधव देखील सामील असल्याचं फियार्दीत नमूद आहे.

**शासकीय निधीचा अपहार**

फियार्दी संदिप सखाराम जाधव यांनी अलिबाग पोलीस ठाण्यात दाखल केलेल्या तक्रारीत म्हटलं आहे की, 'राजेश राम जाधव यांनी रायगड जिल्ह्यातील सर्व पोलीस पाटील यांचे दरमहाचे मानधन कोषागारातून मंजुरी घेऊन प्रत्यक्ष हजर नसलेल्या पोलीस पाटील यांची बनावट नावे तयार केली.

त्यानुसार बनावट देयके कोषागारातून पास करून स्वतःच्या किंवा इतर व्यक्तीच्या बँक खात्यावर जमा केली. त्याचबरोबर, आरोपी यांची पत्नी रिया राजेश जाधव यांनी देखील पोलीस पाटील नसतानाही त्यांच्या नावाचा खोटा दाखला बनवून अंदाजे



१ कोटी ५ लाख ९६ हजार ८०० रुपये कोषागारातून पारित करून घेतल्याचा आरोप आहे. यामुळे या प्रकरणात एकूण शासकीय निधीचा अपहार झाला आहे', असा गंभीर आरोप फियार्दीकडून करण्यात आला आहे.

**विश्वासार्हतेवर गंभीर परिणाम**

फियार्दीत असंही नमूद करण्यात आलं आहे की, 'राजेश राम जाधव यांनी काही पोलीस पाटील यांचे नाव एकाहून अधिक वेळा देयक यादीत नोंदवून, त्यांच्या खात्यावर मानधन जमा करून शासकीय निधीचा स्वेच्छेचा लाभ घेतल्याचा आरोप आहे. यामुळे पोलीस खात्याच्या विश्वासार्हतेवर गंभीर परिणाम झाला आहे.

याप्रकरणी अलिबाग पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक २४७/२०२५ भा.न्या.सं. कलम ३१६(५), ३१८(२), ३१८(४), ३३६(३), ३३७, ३३८, ३३९, ३४४, ३(५) प्रमाणे नोंदवण्यात आला असून, अधिक तपास अलिबाग पोलीस ठाण्याचे प्रभारी पोलीस निरीक्षक किशोर साळे करीत आहेत.

### प्रकरणामुळे मोठा गदारोळ

स्थानिक नागरिक, सामाजिक कार्यकर्ते आणि पोलीस विभागाच्या कर्मचारी यांच्यात या प्रकरणामुळे मोठा गदारोळ उभा राहिला आहे. नागरिकांनी प्रशासनाकडून त्वरित कारवाई करण्याची मागणी केली आहे. भ्रष्टाचाराचा हा प्रकार केवळ आर्थिक फसवणूकपुरताच मर्यादित नाही, तर पोलीस प्रशासनाच्या प्रतिष्ठा आणि जनतेच्या विश्वासावरही प्रश्नचिन्ह निर्माण करत असल्याचं तज्ज्ञांचं मत आहे. स्थानिकांचं म्हणणं आहे की, 'जनतेच्या सुरक्षेसाठी कार्यरत असणाऱ्या पोलीस खात्यातच अशा प्रकारचा घोटाळा झाला, तर प्रशासनाने तात्काळ जबाबदारांवर कठोर कारवाई करणं आवश्यक आहे. अन्यथा नागरिकांचा विश्वास कायम राखणं कठीण होईल.'

### पोलीस प्रशासन काय म्हणालं?

दरम्यान, पोलीस विभागाने या प्रकरणाचा सखोल तपास सुरु केला असून संबंधित खात्यांची तांत्रिक चौकशी केली जात असल्याची अधिकृत माहिती पोलीस प्रशासनाकडून मिळाली आहे. आता प्रशासनाची आणि पोलीस अधिकाऱ्यांची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे. हे प्रकरण पुढील काही दिवसांमध्ये पोलीस खात्यातील घोटाळ्याचं सत्य उघड करेल, अशी शक्यता वर्तवली जात आहे.



## संपादकीय

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# गोरगरीबांच्या मुलांचे शिक्षण वाऱ्यावर




**राज्यातील त्रिभाषा धोरणावरील विरोध वाढत असून, सरकारच्या गतवर्षीच्या संचमान्यता निर्णयामुळे शैक्षणिक व्यवस्था ढासळण्याची भीती आहे. या निर्णयामुळे विशेषतः गोरगरीबांच्या मुलांसाठी शाळेचे दरवाजे कायमचे बंद होण्याचा धोका निर्माण झाला आहे.**

पुरोगामी राज्य म्हणून देशभरात महाराष्ट्र ओळखला जातो. याच पुरोगामी राज्यात शिक्षणाची ज्ञानगंगा गोरगरीबांच्या दारी पोहचविण्यासाठी महापुरुषांनी स्वतःच्या घरावर तुळशीपत्र ठेवले. प्रसंगी पत्नीचे मंगळसूत्र गहाण ठेवून गोरगरीबांच्या मुलांसाठी शाळा चालविल्या. शिक्षण तळागाळापर्यंत पोहचविण्याचा वसा घेतलेल्या महापुरुषांचा वारसा सांगणाऱ्या राज्यकर्त्यांकडूनच आता शाळा बंद करून गोरगरीबांच्या मुलांच्या शिक्षणाचे दरवाजे कायमचे बंद करण्याची धोरणे राबविण्यात येत आहेत. सरकारच्या शैक्षणिक धोरणामुळे मराठी भाषिक शाळा संकटात येऊन दरवर्षी बंद पडत आहेत. मराठी भाषिक शाळा बंद पडत असल्यामुळे मराठी संस्कृतीच्या अस्तित्वाला धोका निर्माण झाला आहे. ग्रामीण भागात नोकरी-व्यवसाय नसल्याने गाव, खेडी ओस पडू लागली आहेत. याचे परिणाम शाळांवरदेखील होऊ लागले आहेत. शाळांचा पट दरवर्षी घसरू लागला आहे. ग्रामीण भागातील मुलांना शिक्षण मिळावे यासाठी सरकारने निर्णय घेणे अपेक्षित असते. मात्र सरकार केवळ धोरणांच्या अंमलबजावणीत अडकून पडते. यामुळे नवीन संकटे निर्माण होतात, याचा आदर्श नमुना म्हणून गतवर्षीच्या संच मान्यतेचा निर्णय म्हणता येईल. राज्यात सर्व व्यवस्थापनाच्या सुमारे १ लाख १० हजार शाळा आहेत. त्यामध्ये सुमारे २ कोटी १२ लाख मुले शिक्षण घेत आहेत. आठवीमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या १९.२८ लाख आहे, तर नववीमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या १८.६३ लाख आहे. शासकीय शाळांमधून इयत्ता आठवीमधून इयत्ता नववीमध्ये प्रवेश घेतेवेळी सुमारे १ लाख विद्यार्थ्यांची गळती होत आहे. त्यापैकी ४० हजार विद्यार्थी खासगी व्यवस्थापनाच्या माध्यमिक शाळेत प्रवेश घेत आहेत. मात्र उर्वरित ६० हजार विद्यार्थी माध्यमिक शिक्षण घेत नसल्याचे दिसत आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा उपलब्ध नसल्यामुळे ही गळती होत असल्याचा दावा शिक्षण विभाग करत आहे. मात्र गळती होणाऱ्या विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न होताना दिसत नाहीत. यातच सरकारने गतवर्षी संच मान्यतेच्या सुधारित निर्णयाद्वारे शासन अनुदानित, अंशतः अनुदानित, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा बंद करण्याचे षडयंत्र रचल्याचा आरोप शिक्षण क्षेत्रातून होत आहे. या निर्णयामुळे गोरगरीब व सामान्य कुटुंबातील विद्यार्थी शिक्षणाच्या मूळ प्रवाहातून बाहेर फेकले जाण्याची भीती व्यक्त होत आहे. शिक्षणाच्या सार्वत्रिकरणाच्या धोरणाला संपुष्टात आणून शिक्षणाच्या बाजारीकरणाचे धोरण शासन प्रत्यक्षात अंमलात आणत आहे. स्वातंत्र्याच्या ७८ वर्षांनंतरसुद्धा राज्यातील ८ हजार २१३ गावांत प्राथमिक शिक्षण देणाऱ्या शाळा नाहीत आणि अस्तित्वात असलेल्या शाळा बंद पाडण्याचे धोरण शासन प्रत्यक्षात राबवित आहे, ही अत्यंत समाजघातक व दुःखदायक बाब असल्याचे मत माजी शिक्षक आमदार ना. गो. गाणार यांनी व्यक्त केले आहे. १५ मार्च २०२४ च्या शासन निर्णयानुसार शैक्षणिक सत्र २०२४-२५ ची संचमान्यता शाळांना वितरित केल्यामुळे शिक्षण क्षेत्रात प्रचंड नाराजी निर्माण झाली आहे. प्रत्येक जिल्ह्यातील अनेक शाळांना शून्य शिक्षकपदे मंजूर करण्यात आली आहेत, तर शून्य शिक्षकपदे मंजूर करण्यात आलेल्या शाळा पयार्याने बंद करण्याचा कट रचण्यात आला आहे. शासन व प्रशासनाच्या शाळा मान्यता माध्यमिक शाळा संहिता आणि बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ मधील तरतुदीनुसार देण्यात येतो. त्यामुळे प्रत्येक शाळेला शैक्षणिक व प्रशासकीय यंत्रणा सांभाळण्यासाठी मुख्याध्यापकाचे पद मंजूर करणे अत्यावश्यक आणि बंधनकारक आहे. मात्र विद्यार्थी संख्येच्या निकषावर मुख्याध्यापकाचे पद देय ठरवले आहे. यामुळे शाळेची प्रशासकीय यंत्रणा उद्ध्वस्त होणार आहे. एकंदरीतच संच मान्यतेचे सुधारित निकष विहित करणारा १५ मार्च २०२४चा शासन निर्णय अस्तित्वात असलेल्या खासगी अनुदानित, शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा संपुष्टात आणून सर्वसामान्यांच्या शिक्षणाचा अधिकार हिरावून घेणारा आहे. त्यामुळे सदर शासन निर्णय तत्काळ रद्द घोषित करून इयत्ता निहाय विषय कार्यभाराच्या आधारे शिक्षक व विशेष शिक्षकांची पदे मुख्याध्यापकाच्या पदासह निश्चित करणारा शासन निर्णय घोषित करणे अत्यावश्यक आहे. त्यामुळे अशैक्षणिक शासन निर्णय दि. १५ मार्च २०२४ रद्द घोषित करून शिक्षण क्षेत्रात निर्माण झालेला हाहाकार थांबवावा, अन्यथा स्फोटक परिस्थिती निर्माण झाल्याशिवाय राहणार नाही. शासनाच्या शैक्षणिक धोरणामुळे मराठी भाषिक शाळांची झालेली दुर्दशा सुधारण्यासाठी धोरणात्मक बदल करण्याच्या हेतूने अभ्यासगट गठित करणे अत्यावश्यक व निकडीचे आहे. संच मान्यतेच्या धोरणाला शिक्षक संघटनांकडून तीव्र विरोध होत आहे. सरकारने संच मान्यतेच्या निकषांमध्ये बदल करण्याची मागणी संघटना करत आहेत. यासाठी संघटनांनी ५ डिसेंबर रोजी शाळा बंद आंदोलन केले. मात्र हे आंदोलन शिक्षण विभागाने चिरडून टाकण्यासाठी आंदोलनात सहभागी होणाऱ्या शिक्षकांचा एक दिवसाचा पगार कापण्याचा निर्णय घेतला. विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या भल्यासाठी संघटना सरकारचे लक्ष्य वेधू इच्छित असतानाही त्याकडे गांभीयार्ने पाहत नाही. त्यामुळे शिक्षण विभागाने गोरगरीब मुलांच्या शिक्षणाचा विचार सोडून दिला आहे का, हे स्पष्ट करण्याची वेळ आली आहे.

# नियमात सूट मिळवून इंडिगोचा हम करे सो कायदा!

**इंडिगोची विमाने जमिनीवर येण्याची ही प्रक्रिया अचानक झालेली नाही. नागरी उड्डाण महासंचालनालय (डीजीसीए) ने वैमानिकांच्या कामांचे तास आणि सुरक्षेच्या दृष्टीने केलेल्या बदलांची माहिती संचालक मंडळाला २४ महिने आधी होती. त्यानंतरही त्यांनी कोणतीच हालचाल केली नाही. त्यांच्या अनेक बैठका झाल्या, त्यात वैमानिकांच्या कामांच्या तासाबद्दलचे नियम आणि अटींवर, प्रवाशांच्या सुरक्षेवर कधीही चर्चा झाली नाही. आता १० फेब्रुवारी २०२६ पर्यंत डीजीसीएने इंडिगोला नियमात सूट दिली आहे. म्हणजेच या वादात जिंकलं कोण, हरलं कोण आणि कोणाचा डाव यशस्वी ठरला हे लक्षात येतं.**




इंडिगोने सर्वांनाच जमिनीवर आणले आहे. इंडिगोने नागरी उड्डाण महासंचालनालय (डीजीसीए) वर दबाव वाढवण्यासाठी त्यांच्या सर्व फ्लाईट्स रद्द केल्या का? अशी चर्चा आता सर्वत्र होत आहे. सोशल मीडियावर काही उच्चाधिकाऱ्यांची नावे आणि फोटो फिरत आहेत. त्यासोबतच इंडिगोची विमाने रद्द होण्याला कारणीभूत नेमकं कोण आहेत, याचीही चर्चा आता होत आहे. इंडिगोने कोणाचीही तमा बाळगली नाही. मंत्री, सरकार आणि डीजीसीएची तर नाहीच, सात, आठ आणि नऊ डिसेंबरलाही इंडिगोच्या विमानांची चाके रनवेला चिकटून होती. विमाने हवेत झेपावलीच नाहीत. सात डिसेंबरला ६०० हून अधिक तर आठ डिसेंबरला ५०० हून अधिक उड्डाणे रद्द करण्यात आली.

दिल्लीतील इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावर १३१ उड्डाणे रद्द करण्यात आली. अहमदाबाद विमानतळाने आठ तर चेन्नई विमानतळाने इंडिगोची ७१ फ्लाईट्स रद्द झाल्याचे सांगितले. इंडिगोने सांगितले आहे की १० ते १५ डिसेंबरपर्यंत आम्ही सर्व पूर्ववत करू. मात्र तसं काहीही होताना दिसत नाही. इंडिगोने नऊ डिसेंबरपर्यंत ८२७ कोटी रुपये रिफंड केले. भारतीय नागरी उड्डाण मंत्रालयाने इंडिगोला सात डिसेंबरच्या रात्री ८ पर्यंत प्रवाशांचे पैसे परत करण्याचे आदेश दिले होते. त्याची वेळ त्यांनी पाळली. आता सर्वकाही सुरळीत होईल असे वाटत होते, मात्र आठ डिसेंबरला देखील ५०० फ्लाईट्स रद्द करण्यात आली. त्यासोबतच आठ तारखेलाच इंडिगोच्या शेअर्सची पडझड सुरू झाली.

डिरेक्टरेट जनरल ऑफ सिव्हिल एव्हिएशन डिपार्टमेंटने (डीजीसीए) इंडिगोला काही प्रश्नांची उत्तरे मागितली. गेल्या आठवड्यात झालेल्या इंडिगोच्या गैरकारभारामुळे प्रवासी त्रस्त झाले. ही परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी कंपनीने नेमके काय केले, याची माहिती घेण्यासाठी इंडिगोचे मुख्य कार्यकारी अधिकारी पीटर एल्बर्स यांना बुधवारी मंत्रालयात बोलावण्यात आले. केंद्रीय नागरी हवाई वाहतूकमंत्री के. राम मोहन नायडू यांनी आपल्या कार्यालयातच कंट्रोल रूम स्थापन केल्याचे ट्विट करून सांगितले, पण तोपर्यंत इंडिगोने घालायचा तो सगळा गोंधळ घालून झालेला होता. तर विमान उड्डाणे रद्द केल्यामुळे इंडिगोला कारणे दाखवा नोटीस दिली गेली.

डीजीसीए इंडिगोच्या बोर्ड ऑफ मॅनेजमेंटमध्ये मोठे बदल करण्याची शक्यता आहे. म्हणजेच एका प्रायव्हेट कंपनीने त्यांच्या खराब मॅनेजमेंटमुळे हजारो लोकांना त्रस्त केले, आता सरकार त्यांचेच बोर्ड ऑफ मॅनेजमेंट बदलण्याची तयारी करत आहे. आता हे मॅनेजमेंट बदलण्यापूर्वी यामध्ये कोण-कोण आहेत ते जरा समजून घेतले पाहिजे. इंडिगोचे बोर्ड ऑफ डिरेक्टर्समध्ये नऊ लोक आहेत. सध्या इंडिगोचे चेअरमन आहेत, विक्रम सिंह मेहता, हे शेलचे चेअरमन होते. क्रमांक दोनवर आहेत व्यवस्थापकीय संचालक राहुल भाटिया. यांनीच इंडिगोची स्थापना केली आहे. हे इंडिगोचे को-फाऊंडर आहेत. तर तिसरे नाव हे तुम्ही नक्कीच वाचले, ऐकले असणार, ते म्हणजे अमिताभ कांत. हे दिल्लीतील राजकीय वतुर्ळातील चर्चीत नाव आणि चेहरा. अमिताभ कांत हे भारत सरकारचे धोरण ठरवणाया नीती आयोगाचे चेअरमन होते. २०२३ मध्ये भारताने जी-२० समिटचे नेतृत्त्व केले होते, तेव्हा अमिताभ कांत यांच्याच खांद्यावर संपूर्ण जबाबदारी होती.

भारत सरकारसाठी ते महत्त्वाचे होते आणि आता इंडिगोमध्ये त्यांची भूमिका नेमकी किती महत्त्वाची असेल याचा विचार करा. इंडिगोमध्ये जेव्हा गडबड सुरू झाली, उड्डाणे रद्द होऊ लागली. लोक त्राहीभगवान करू लागले तेव्हा त्यांना त्याबद्दल विचारले गेले, तर ते म्हणाले मी अजून इंडिगोमध्ये नवीन आहे. तुम्ही याबद्दल चेअरमनला विचारा. संचालक मंडळात भारत सरकारच्या सेवेत प्रदीर्घकाळ काम करणारे एअर चीफ मार्शल (निवृत्त) बी.एस. धनोवा हे देखील आहेत. भारतीय वायूदलातील असे उच्चाधिकारी आता इंडिगोच्या संचालक मंडळात आहेत. त्यासोबतच एम. दामोधरन हे सेबीचे माजी चेअरमन राहिलेले आहेत, म्हणजेच स्टॉक मार्केटला रेग्यूलेट करणाया संस्थेचे ते प्रमुख होते. एफएएचे अर्थात फेडरल एव्हिएशन ॲडमिनिस्ट्रेशनचे चेअरमन मायकल व्हिटेकर हे देखील संचालक मंडळात आहेत.

एफएए ही संस्था अमेरिकेत एव्हिएशन संस्थेला रेग्यूलेट करते. आणखी एक आंतरराष्ट्रीय नाव इंडिगोने आपल्या बोर्ड ऑफ डिरेक्टर्समध्ये जोडले आहे. ग्रेग सेरस्की, हे व्हेस्ट जेटचे सीईओ होते. ही कॅनेडियन एअरलाईन कंपनी आहे. अशा प्रकारे देशातील आणि जगातील हवाई क्षेत्र, आर्थिक आघाड्यांवरील आणि मुख्य म्हणजे सरकारसोबत थेट संपर्क असलेले लोक इंडिगोच्या संचालक मंडळात आहेत. त्यानंतर वकील पल्लवी शार्दूल श्रॉफ या देखील आहे. आठवे नाव आहे अनिल पाराशर. संचालक मंडळातील एक सदस्य. सध्या इंडिगोसोबत नाहीत. ते म्हणजे अनिल गंगवाल. गंगवाल यांनी राकेश भाटिया यांच्यासोबत इंडिगोची स्थापना केली. मात्र मध्यंतरीच्या काळात त्यांचे आणि भाटियांचे खटके उडाले, दोघे एकमेकांविरोधात कोर्टात गेले. त्यानंतर फेब्रुवारी २०२२ मध्ये गंगवाल हे इंडिगोमधून राजीनामा देऊन बाहेर पडले होते. आता या मॅनेजमेंटमध्ये भारत सरकार बदल करण्याची चर्चा सुरू झाली.

इंडिगोची विमाने जमिनीवर येण्याची ही प्रक्रिया अचानक झालेली नाही. डीजीसीएने वैमानिकांच्या कामांचे तास आणि सुरक्षेच्या दृष्टीने केलेल्या बदलांची माहिती या बोर्ड ऑफ डिरेक्टरला २४ महिने आधी होती. त्यानंतरही त्यांनी कोणतीच हालचाल केली नाही. त्यांच्या अनेक बैठका झाल्या, त्यात वैमानिकांच्या कामांच्या तासाबद्दलचे नियम आणि अटींवर, प्रवाशांच्या सुरक्षेवर कधीही चर्चा झाली नाही. आता १० फेब्रुवारी २०२६ पर्यंत डीजीसीएने इंडिगोला नियमात सूट दिली आहे. म्हणजेच या वादात जिंकलं कोण, हरलं कोण आणि कोणाचा डाव यशस्वी ठरला हे लक्षात येतं. इंडिगोने पायलट्स आणि कर्मचार्यांसोबत वागण्याची पद्धत बदललेली नाही. गेल्या पाच वर्षांमध्ये इंडिगोचा व्यवसाय वाढत चालला आहे. नव्या डेस्टिनेशन्सला इंडिगोची विमाने उड्डाणं घेत आहेत. मात्र त्या तुलनेत पायलट्सची भरती केली का? तर त्याचे उत्तर त्यांच्याकडे नाही. समोर आलेले आकडे अधिक बोलके आहेत. गेल्या काही वर्षांमध्ये त्यांनी पायलट्सची किती भरती केली ते यावरून लक्षात येते.

२०१९-२० मध्ये ८३० पायलट्स, २०२२-२३ मध्ये ६१६ पायलट्स, २०२३-२४ मध्ये ६३१ पायलट्स, २०२४-२५ मध्ये ४१८ पायलट्स. इंडिगोच्या एका वरिष्ठ पायलटने नाव न छापण्याच्या अटीवर सांगितले की, इंडिगोचे संकट हे कृत्रिम आहे. आमच्याकडे ४,५५१ पायलट्स आहेत, कमतरता फक्त १२४ पायलट्सची होती. त्यामुळे दैनंदिन २२०० फ्लाईट्सपैकी अडचण झालीच असती तर फक्त चार ते पाच टक्के उड्डाणांना फटका बसला असता. मात्र जाणून-बुजून एसओपीला हरताळ फासण्यात आला. स्टँड बाय रोस्टर खाली ठेवण्यात आले. वैमानिकांना शेवटच्या क्षणी कॉल करण्यात आले. ज्यामुळे ऐनवेळी गडबड झाली पाहिजे. आणि सरकारवर दबाव निर्माण होऊन सरकारने आणलेले नवे सुरक्षा नियम त्यांनी मागे घेतले पाहिजे. थोडक्यात सांगायचे तर इंडिगोचे हे संकट नैसर्गिक नाही तर पूर्णपणे इंडिगो निर्मित आणि कृत्रिम होते. इंडिगोने फक्त नफा कमावण्यासाठी आणि सरकारी नियमांतून सूट मिळण्यासाठी हे सर्व केले होते, अशी चर्चा आता होत आहे.

इंडिगोचे मुख्य कार्यकारी अधिकारी पीटर एल्बर्स यांना मंत्रालयात बोलावून त्यांच्याकडून माहिती घेण्यात आली आहे. ८ डिसेंबरला त्यांनी म्हटले आहे की, आम्ही बोर्ड ऑफ डिरेक्टर्सची दैनंदिन बैठक घेऊन सर्व परिस्थितीवर लक्ष ठेवून आहोत. त्यासोबतच त्यांनी सांगितले की, ४ डिसेंबरला बोर्डने क्राइसेस मॅनेजमेंट ग्रुप तयार केला. त्यासोबतच इंडिगोने चार महत्त्वाची उद्दिष्टे निश्चित केली. १ - उड्डाणे योग्य पद्धतीने सुरू करायची, २ - प्रवाशांना वेळेवर सर्व माहिती दिली जाईल, ३ - फ्लाईट्स योग्य प्रकारे रि-शेड्यूल होतील आणि ४ - प्रवाशांना रिफंड वेळेवर मिळेल याची काळजी घ्यायची, त्यांचे सामान लवकरात लवकर त्यांच्यापर्यंत पोहोचेल. याची दक्षता घेतली जाणार आहे. इंडिगोच्या सर्व कारभारावर आता डीजीसीए नजर ठेवून आहे. फक्त बाहेरूनच नाही तर थेट डीजीसीएच्या कॉर्पोरेट ऑफिसमध्ये बसून त्यांच्या ऑपरेशन्सवर लक्ष ठेवले जाणार आहे. त्यासाठी डीजीसीएने दोन अधिकारी तैनात केले आहेत.

डीजीसीएचे उपसंचालक ऐश्वीर सिंह आणि वरिष्ठ स्टॅटिस्टिकल अधिकारी मणिभूषण हे आता इंडिगोच्या कॉर्पोरेट ऑफिसमध्ये बसून कारभारावर देखरेख ठेवणार आहेत. हा निर्णय बुधवारी घेण्यात आला. या दोन्ही अधिकार्यांच्या नेतृत्वात दोन टीम इंडिगोच्या कारभारावर नजर ठेवणार आणि त्याचा दैनंदिन अहवाल सायंकाळी सहा वाजता सादर केला जाणार आहे. कंपनीकडे किती विमाने आहेत. दिवसाला किती उड्डाणे होतात. वैमानिकांची संख्या नेमकी किती आहे. कोणत्या मार्गावर उड्डाण होते. वैमानिक आणि क्रू मेंबर्सच्या कामकाजाचे तास किती असतात. प्रशिक्षणार्थी क्रू मेंबर्स किती आहेत. दोन शिफ्टमध्ये किती कर्मचारी काम करतात. प्रत्येक दिवशी आकस्मिक रजा किती पायलट्स आणि कर्मचार्यांच्या असतात. एकूण उड्डाणे आणि त्या तुलनेत किती वैमानिक, कर्मचारी कंपनीकडे असतात. ते नसल्यामुळे किती उड्डाणांवर परिणाम होतो. तसेच राखीव वैमानिक आणि कर्मचार्यांची संख्या किती असते, या सर्व बाबींवर आता डीजीसीए देखरेख ठेवणार आहे.

वास्तविक हे सर्व तर याआधीच व्हायला पाहिजे होते. मग याला एवढा उशीर का झाला? एवढी नामुष्कीची वेळ इंडिगोने का येऊ दिली? खरा प्रश्न तर वेगळाच आहे. हे सर्व अजून किती दिवस चालणार आहे? सरकार आणि इंडिगो यांच्या दरम्यान सामंजस्य कसे निर्माण होणार? का सरकार इंडिगोसाठी त्यांच्या नियमांमध्ये अजून ढील देतच राहाणार आहे? आणि सर्वात महत्त्वाचा प्रश्न म्हणजे या सर्व प्रकरणात डीजीसीएचं काही उत्तरदायित्त्व आहे की नाही? आशा आहे की, या संकटातून इंडिगो लवकरच मार्ग काढेल आणि डीजीसीए एका प्रायव्हेट प्लेअरला आपली ताकद दाखवून सामान्य नागरिकांना वेठीस धरण्याच्या त्यांच्या आडमुठ्या धोरणाला वेळीच वेसण घातली जाईल.

# पक्षांच्या युती, आघाडींबाबत उत्सुकता

**महापालिका निवडणुकांचे बिगुल वाजले असून, प्रत्येक पक्षांकडून जोरदार तयारी सुरू झाली आहे. महापालिकेच्या निवडणुकांच्या हालचाली सुरू झाल्यानंतर शहरातील प्रत्येक पक्षाने उमेदवारांची चाचपणी सुरू केली आहे. कोण कोणाशी युती करणार, कोण कोणाशी आघाडी करणार याबाबत उत्सुकता आहे.**




निवडणुकांचा मार्ग मोकळा झाल्यानंतर पुण्यात महायुती आणि महाविकास आघाडी एकमेकांच्या राजकीय हालचालींवर लक्ष ठेऊन आहेत. भाजप स्वबळावर निवडणुका लढविण्यासाठी तयारीला लागली आहे, तर, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाकडून, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाशी हातमिळवणी करण्यासाठी चाचपणी करून भाजपवर दबाव आणत आहे. महाविकास आघाडीतील उद्धव बाळासाहेब ठाकरे ही मनसेशी युती करण्यासाठी सकारात्मक आहे. त्यामुळे आता शिवसेना-मनसे एकत्र आल्यास काँग्रेसच्या भूमिकेकडे लक्ष लागून राहिले आहे. काँग्रेसने विरोधी भूमिका घेतल्यास वंचित बहुजन आघाडीचा पाठिंबा घेण्यासाठी शिवसेना प्रयत्नशील असणार आहे. महायुतीतील भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्ष आणि शिवसेना एकनाथ शिंदे पक्ष हे तिन्ही पक्ष स्वबळावर की महायुती, याबाबत राज्य पातळीवरील नेत्यांच्या आदेशाकडे लक्ष लागले आहे.

पुणे महापालिकेच्या २०१७ च्या निवडणुकीत ९७ नगरसेवक निवडून आल्याने भाजपने 'मिशन १२५' निश्चित केले आहे. स्वबळावर निवडणुका लढवण्यावर भाजपचा जोर आहे. त्यानुसार भाजपने तयारीही सुरू केली असून, विधानसभा मतदारसंघनिहाय आढावा बैठकांना सुरुवात केली आहे. मागील महिन्यात झालेल्या भाजपच्या पश्चिम महाराष्ट्रातील पदाधिकाऱ्यांच्या आढावा बैठकीत 'मिशन १२५' निश्चित करण्यात आले आहे. पक्षबळकटीसाठी सर्वांना प्रवेशद्वार खुले करण्यात आले आहे. अन्य पक्षातील प्रभावी पदाधिकाऱ्यांना यापूर्वीच भाजपमध्ये प्रवेश देण्यात आला आहे. भाजपने सगळ्या नियुक्त्या करून व्यूहरचनेत आघाडी घेतली आहे. महायुती झाल्यास राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्ष आणि शिवसेना एकनाथ शिंदे यांच्या पक्षांसोबत मिळते-जुळते घ्यावे लागणार आहे. मागील निवडणुकीत या दोन पक्षांबरोबर भाजपने दोन हात करून सत्ता मिळवली होती. अशा परिस्थितीत पुण्यात स्वबळावर लढण्यासाठी भाजप पदाधिकारी आग्रही आहेत. अजित पवार यांची राष्ट्रवादी प्रचंड आशावादी आहे. पण, अजित पवार यांची जनसंवाद यात्रा आणि जनता दरबार झाल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा झंझावात थंडावला होता. आता पुन्हा एकदा पक्षाच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. सुनील टिंगरे आणि सुभाष जगताप या दोघांची शहराध्यक्षपदी निवड झाली. भाजप स्वबळाच्या दिशेने जात असल्याने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने राजकीय दबावतंत्र सुरू केले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षासोबत आघाडीची चाचपणीही सुरू आहे. पण, असे झाल्यास राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांनी नाराजी व्यक्त करत काही काळासाठी राजकारण सोडण्याचेही जाहीर केल्याने दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येतील का हे पाहणे औत्स्युक्याचे ठरेल.

दुसरीकडे शिंदेंची शिवसेना सवंगड्यांच्या शोधात आहे. रवींद्र धंगेकर वगळता पक्षातील अन्य स्थानिक नेते फारसे आक्रमक दिसून येत नाहीयेत. शहरातील पक्षाची स्थिती कमकुवत आहे. त्यामुळे पक्षबळकटीसाठी अन्य पक्षातील पदाधिकारी पक्षात येतील का, याची चाचपणी सुरू आहे. मात्र, अद्याप एकही पदाधिकारी, माजी नगरसेवक पक्षाच्या हाती लागले नसल्याने पक्ष शांततेच्या भूमिकेत दिसून येत आहे. फक्त नाना भानगिरे हे माजी नगरसेवक पक्षाकडे आहेत. प्रसंगी धंगेकर यांनी स्वबळाचा नारा दिला आहे. पण, प्रत्येक प्रभागात सुशिक्षित आणि तरुण उमेदवार देण्यावर भर देण्यात येणार आहे. महाविकास आघाडीतील काँग्रेस सध्या सुस्त अवस्थेत दिसून येत आहे. निवडणुकीच्या तयारीसाठी बैठका घेण्यास फारसे उत्सुक दिसत नाहीत. महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसने संघटनात्मक बदल करण्याचा निर्णय घेतला असताना काही ज्येष्ठ पदाधिकाऱ्यांनी राजीनाम्याची भाषा केल्याने दोन शहराध्यक्ष नेमण्याच्या निर्णयाला स्थगिती देण्याची नामुष्की ओढवली आहे.

यावरूनच पक्षबळकटीसाठी काँग्रेसची तयारी नसल्याचे चित्र दिसून येत आहे. साडेतीन वर्षांत काँग्रेसकडे पूर्णवेळ शहराध्यक्षही नाही. एकेकाळी महापालिकेवर निर्विवाद वर्चस्व असलेल्या काँग्रेसचे गेल्या निवडणुकीत फक्त नऊ नगरसेवक निवडून आले होते. पक्षातील गटबाजीही उसळून आल्याने काँग्रेस सध्या कुठल्याच चित्रात नाही. निवडणुका जवळ आल्या तरी काँग्रेसकडून उमेदवारी घेऊन लढण्यास कोणी फारसे इच्छुक दिसत नाहीत. त्यामुळे सध्या तरी पुणे शहारातील काँग्रेसकडे इच्छुक उमेदवारांची वानवा असल्याचे चित्र आहे. सर्व प्रभागांमध्ये उमेदवार उभे करता यावेत यासाठी प्रभागातील लोकसंपर्क असलेल्या डॉक्टर, वकिलांना उमेदवारी घेण्यासाठी गळ घालण्याची नामुष्की काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांवर आली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षात दोन मतप्रवाह निर्माण झाले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षासोबत आघाडी करायची की नाही याबाबत दोन मतप्रवाह आहेत. शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांचा याला ठाम विरोध आहे. मविआतील शिवसेना ठाकरे पक्षाचा फारसा प्रभाव शहरात नाही. त्यात राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षासोबत हातमिळवणी केल्यास निवडणुकीत फायदा होईल. असे काही पदाधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. मात्र, या दोन मतप्रवाहांमुळे पक्षात विसंवाद निर्माण झाला आहे हे मात्र नक्की.


शिवसेना ठाकरे गटाची पुण्यात अस्तित्वासाठी धडपड सुरू आहे. प्रभावी नेता पक्षात नाही. राज्य पातळीवरील नेत्यांनी शहरात लक्ष घालायला सुरू केले आहे. शिवसेना ठाकरे गटाने सर्वच्या सर्व जागी उमेदवार देण्याची तयारी केली आहे. मनसेसोबत जायचे की नाही याबाबत वरिष्ठ पातळीवर निर्णय होईल. पण, सर्वच ठिकाणी उमेदवार देणार असल्याने मनसेवर शिवसेनेचा भरोसा नाही का, अशी चर्चाही राजकीय वतुर्ळात सुरू झाली आहे. पण, शिवसेनेने मनसेसोबत वंचित बहुजन आघाडीला बरोबर घेण्याची शक्यता वर्तवली आहे. मनसेचे तळ्यात- मळ्यात सुरू आहे. आघाडीत जायचे की नाही याबाबत स्पष्ट आदेश नसल्याने कार्यकर्ते संभ्रमावस्थेत आहेत. पक्षवाढीसाठी प्रयत्न होताना दिसून येत नाहीत. त्यामुळे निवडणुका आल्या असून, मनसेचे तळ्यात-मळ्यात सुरू आहे, असे दिसून येत आहे.

## क्रांतिध्वजा

अत्तर सुगंधी होण्यासाठी फुलं सुगंधी हवीत, तशी नाती सुंदर होण्यासाठी मनं निर्मळ हवीत. संत बहेणाबाईंनी पराकोटीच्या वेदना देणाऱ्या पतीलाही प्रेमानं जपलं. त्यामुळेच सद्गुरू तुकोबांच्या साक्षात दर्शनाचा सुयोग येण्यानं बहेणा अंतर्बाह्य रोमांचित झाली. सद्गुरूंना अनन्यभावानं शरण जात ती म्हणते,

**तुकोबाची कथा वेदातील अर्थ।**
**पावे माझे चित्त समाधान।।**

बहेणेच्या या परमानंदात पतीदेवांचा सहभागही सुखद होता, मात्र या सुखात 'मंबाजीनं' मिठाचा खडा टाकला. बहेणेचा छळवाद मांडला. तिची देहूतून हकालपट्टी व्हावी, अशी योजना केली. शिऊरला रवानगी झाली. पुत्र 'विठोबा' व कन्या 'काशी' यांच्या जन्मानंतर बहेणेचं कुटुंब शिऊरला आलं. बहेणाबाईंची अध्यात्मसाधनाही क्रांतदर्शी, जीवनमुक्तावस्थेतील होती. 'काय करू ऐसे जाले। तुकारामे ऐसे केले।।' असं अतींद्रिय वर्णन करणं सोपं का आहे? आपल्याला होत असलेल्या सर्वत्र 'स्वरूप-दर्शन' अनुभूतीचं चित्रणही तिनं केलंय. वयाच्या २१व्या वर्षी त्यांनी जीवनमुक्तीचा कळस गाठला. तुकोबांच्या माघारी बहेणेनं सुमारे अर्ध शतक आपल्या काव्य नि कीर्तनाद्वारे लोकजागर कार्य केलं. संतकृपा झाली। इमारत फळा आली।। ज्ञानदेवे रचिले पाया। रचियेले देवालया।। नामा तयाचा किंकर। तेणे केला हा विस्तार।। जनार्दन एकनाथ। ध्वज उभारिला भागवत।।भजन करा सावकाश। तुका झालासे 'कळस'।। आपल्या सद्गुरूंना बहेणाबाईनं 'कळस' म्हणावं हे स्वाभाविकच. संतांच्या कायार्चं असं अचूक मूल्यमापन बहेणाबाईनं केल्याचं सर्वश्रुत आहे. 'कर्म' हीच खरी पूजा, हा कृतिपाठ बहेणाबाईंनी आपल्या शिष्यांसह सर्वांना दिला.



# छोले सॅलड

**साहित्य :** २०० ग्रॅम छोले (७-८ तास भिजवून उकडून घेतलेले), १ कांदा बारीक चिरलेला, २ चेरी टोमॅटो बारीक चिरलेले, वरून भुरभुरण्यासाठी पार्सली, २ चमचे ऑलिव्ह ऑइल, २ चमचे बारीक चिरलेली लसूण, १ चमचा चिली फ्लेक्स, २-३ चमचे लिंबाचा रस, मीठ, मिरपूड.

**कृती:** एका वाडग्यामध्ये लसूण, ऑलिव्ह ऑइल, मीठ मिरपूड, चिली फ्लेक्स आणि लिंबाचा रस एकत्र ढवळून घ्या. उकडलेल्या छोल्यांमध्ये ते मिसळा. आता यात कांदा, टोमॅटो घालून घ्या. नीट मिसळून थंड करायला ठेवा. वरून पार्सली भुरभुरा. छोले चाट आपण नेहमीच करतो पण हे आणखी थोडं वेगळ्या चवीचं सॅलड. यामध्ये छोल्यांऐवजी राजमाही वापरता येईल. पॅन टॉस करून पास्ताही त्यात मिसळता येईल.

# तरुण दिसायचे आहे, मग तुमच्यासाठी खास टिप्स...

सर्वच तरुणींना आपली त्वचा सुंदर असावी, आपण छान दिसावे असे वाटत असते. मात्र सर्वांनाच ते जमत नाही, कारण आपण जो फेस पॅकचा वापर करतो तो तितकीच त्वचा गोरी करतो. तुमच्या शरीराचा प्रत्येक भाग छान दिसण्यासाठी आम्ही तुम्हाला देत आहोत काही खास टिप्स, त्या पुढीलप्रमाणे :



■ ज्या लोकांना कोणतीही ॲलर्जी असते अशा लोकांनी मध व दुधात स्नान करणे फायदेशीर असते. या स्नानामुळे त्वचेला अंतर्गत पोषण मिळते. ■ त्वच्या कोमल होण्यासाठी दूध आणि मध एकत्र मिक्स करून स्नान केल्यास त्वच्या कोमल राहते. दुधामधील प्रोटीन आणि फॅटचे प्रमाण त्वचेला आतून एक्सफोलिएट करण्याचे काम करते. याव्यतिरिक्त दुधातील लॅक्टिक ॲसिड मृत पेशींना दूर करण्याचे काम करते. त्यामुळे त्वचेवरील ड्रायनेस कमी होतो. ■ तसेच या स्नानामुळे तुम्ही लवकर वृद्ध होणार नाही त्यामुळे तुमची त्वचा तरुण दिसते. ■ मध आणि दूध एकत्रित घेतल्यास थेट नर्व्हस सिस्टमवर प्रभाव पडतो. दूध त्वचेला कोमल बनवते तर मध त्वचेला नवजीवन प्रदान करते. ■ अरोमासाठी सी सॉल्ट आणि लेव्हेंडर ऑइल वापरले जाते. तणाव दूर करण्यासाठी सुद्धा या मिश्रणाने स्नान केले जाते.

# म्हातारपणात सर्वात जास्त होतात हे ३ आजार, ५० वर्षांचे झाले असाल तर सावध व्हा

**म्हातारपणात** मनुष्याला काही आजारपण जास्त त्रास देतात. हे आजार म्हातारपणाचे दुखणे अधिक वाढवतात. एक्सपर्टचे म्हणणे आहे की, वाढत्या वयात मनुष्याच्या शरीराची प्रतिरोधक क्षमता कमी होऊ लागते आणि त्याला बरेच आजार होऊ लागतात. पण काही असे आजार आहे जे ५० वर्षांहून जास्त वयाच्या महिला आणि पुरुषांना सर्वात जास्त होतात. तर जाणून घेऊ कोणते गंभीर आजार आहेत जे ५० वर्षांनंतर जास्त होतात.

**हृदयरोग**

सेंटर्स ऑफ डिसिज कंट्रोल अँड प्रीव्हेंशनचे म्हणणे आहे की, अमेरिकेत हृदयरोग पहिल्या क्रमांकावर आहे, जो म्हाताऱ्यांमध्ये जास्त दिसून येतो. ५० वर्षे पूर्ण केल्यानंतर हा आजार वाढू लागतो. भारतीय म्हाताऱ्यांमध्ये हा आजार जास्त प्रमाणात आढळून आला आहे.

**कर्करोग**

सेंटर फॉर डिसिज कंट्रोलचे म्हणणे आहे की, हार्ट ॲटॅकनंतर दुसऱ्या क्रमांकावर म्हाताऱ्यांमध्ये होणारे आजार म्हणजे कर्करोग. अमेरिकेत हार्ट ॲटॅकनंतर दुसऱ्या क्रमांकावर सर्वात जास्त मृत्यू कर्करोगामुळे होते. ५० वर्षांनंतर पुरुषांमध्ये लंग कर्करोगाचा धोका वाढू लागतो. तसेच महिलांमध्ये या वयात सर्वात जास्त स्तन कर्करोगाची लक्षणे दिसू लागतात. फुफ्फुस आणि स्तन कर्करोगानंतर पोटाचा आणि प्रोटेस्टेट कर्करोगाचा धोका वाढू लागतो.

**स्ट्रोक**

स्ट्रोक मस्तिष्क संबंधी आजारांमध्ये सर्वात सामान्य आजार आहेत. अमेरिकेत हार्ट ॲटॅक आणि कर्करोगानंतर सर्वात जास्त रुग्णांचा मृत्यू या आजारामुळे होतो. हे आजार सर्वात जास्त म्हाताऱ्या लोकांना प्रभावित करतात.



# धणे-हळदीच्या मिश्रणाने दूर करा पिंपल, ब्लॅकहेड्सची समस्या!

**चेहऱ्यावरचे** डाग, ॲक्ने, ब्लॅकहेड्सच्या समस्येपासून सुटका मिळवण्यासाठी तुम्ही ब्युटीपार्लरमध्ये काही ट्रीटमेंट्स घेतल्या असतील. पण काही घरगुती उपायांनी अगदी सुरक्षितरित्या तुम्ही या समस्येपासून सुटका मिळवू शकता. असाच एक उपाय म्हणजे 'धणे' !

**फायदेशीर उपाय -** धण्याचं (कोथिंबीरीच्या बिया) पाणी आणि हळद एकत्र करून चेहऱ्याला लावावे. यामधील ॲन्टीबॅक्टेरियल गुणधर्म त्वचेवर पिंपल्सची निर्मिती करणाऱ्या बॅक्टेरियांचा नाश करतात. कोथिंबीरीमध्ये 86.3% मॉईश्चर असते. यामुळे त्वचा रिहायड्रेट होण्यास मदत होते. यामुळे चेहऱ्यावरील डाग कमी होण्यास मदत होते. हळद आणि कोथिंबीर या दोन्हींमध्ये ॲन्टीऑक्सिडंट्स आणि व्हिटामिन्सचा मुबलक साठा असल्याने त्वचेचा पोत सुधारण्यासाठी मदत होते.





**साहित्य-**

▮ दोन चमचे धणे ▮ चमचाभर हळद ▮ ग्लासभर पाणी

**कसे बनवाल मिश्रण**

▮ ग्लासभर पाण्यात धण्याचे दाणे टाकून पाणी उकळा. पाण्याचा रंग बदलल्यानंतर गॅस बंद करा. मिश्रण थंड झाल्यानंतर पाणी गाळून घ्या. ▮ या पाण्यात थोडी हळद मिसळून पेस्ट बनवा. मात्र अतिप्रमाणात हळद वापरू नका, अन्यथा चेहरा पिवळा होईल. ▮ रात्री हे मिश्रण चेहऱ्याला लावा आणि सकाळी चेहरा स्वच्छ धुवा. ▮ सतत तीन-चार रात्री हा प्रयोग केल्यास तुमच्या चेहऱ्यावरील डाग, ॲक्ने कमी होण्यास मदत होईल.

# असे बनवा लोणचे, तर वाढेल चव आणि रंगत...

कैरीचे लोणचे, लिंबाचे लोणचे, मिरचीचे लोणचे, व्हेज लोणचे, अनेक प्रकाराचे लोणचे घरी अगदी आरामात तयार केले जातात. पण हेच लोणचे अधिक चविष्ट बनवण्यासाठी काही सोप्या टिप्स. याने लोणचाच्या रंगही आकर्षक दिसेल.

▮ रंग आणि चव हे दोन्ही वाढवण्यासाठी लोणच्याचा तेलात गरम न करता मोहरीचे तेल घालायला हवं ▮ गोड आंब्याच्या लोणच्यात साखर मिसळून गॅसवर शिजवावे. ▮ चविष्ट लोणचे बनवण्यासाठी कुटलेली नव्हे तर अख्खी मोहरी वापरायला हवी.



# टेम्पर्ड ग्लास असूनही का खराब होते मोबाइल स्क्रीन

फोनच्या स्क्रीनला संरक्षण देण्यासाठी तुम्ही देखील टेम्पर्ड ग्लास वापरत असाल. बऱ्याच प्रसंगी हे टेम्पर्ड ग्लासेस फक्त फोन स्क्रॅचपासून वाचवू शकतात. पण, गार्ड डिस्प्ले क्रॅक होण्यापासून वाचवू शकत नाहीत.

**स्मार्टफोनला** कोणत्याही प्रकारचे नुकसान पोहचू नये आणि संरक्षणाचा अतिरिक्त स्तर देण्यासाठी युजर्स स्क्रीन गार्ड वापरतात. बाजारात अनेक प्रकारचे स्क्रीन गार्ड उपलब्ध आहेत. काही लोक त्यांना टेम्पर्ड ग्लास असेही म्हणतात. तुम्ही रस्त्याच्या कडेला असलेल्या विक्रेत्याकडून स्क्रीन गार्ड विकत घेतल्यास ते जवळपास १०० रुपयांमध्ये सुद्धा मिळेल. काहींना तर, तर ५० रुपयांतही मिळू शकतात. स्मार्टफोनच्या मॉडेलनुसार त्याची किंमत अनेक वेळा वाढते. दुसरीकडे, जर तुम्ही ऑनलाइन गेलात, तर तुम्हाला हे स्क्रीन गार्ड १०० रुपयांपासून ते १००० रुपयांपर्यंतच्या किमतीत मिळतात. स्क्रीन गार्डसाठी इतक्या किमती का? असा प्रश्न तुम्हालाही पडत असेल.



**स्क्रीन का तुटते ?**

तुम्हाला फोनची स्क्रीन स्क्रॅचपासून वाचवायची असेल, तर हे स्वस्त गार्ड हे काम अगदी सहज करू शकतात. परंतु, काही वेळा ते स्क्रीन तुटण्याचे कारणही बनते. डिस्प्लेवर जाड स्क्रीन गार्ड लावल्यानंतर स्क्रीन आणि कव्हरमधील अंतर संपते. यामुळे, तुमचा फोन पडताच, त्याचा परिणाम डिस्प्लेवर पडतो, जो स्क्रीन गार्ड नसेल तर, कमी होऊ शकते.

टेम्पर्ड ग्लास ऑनलाइन शोधल्यास तुम्हाला १०० रुपयांपासून ते २००० रुपयांपेक्षा अधिक किमतीचे गार्ड उपलब्ध असल्याचे दिसून येईल. महत्त्वाचे म्हणजे या टेम्पर्ड ग्लासची किंमत बाजाराच्या तुलनेत खूपच कमी आहे.

## महागड्या स्क्रीन गार्डमध्ये काय खास आहे?

बाजारात उपलब्ध असलेले स्वस्त टेम्पर्ड ग्लास किंवा स्क्रीन प्रोटेक्टर तुमच्या फोनच्या स्क्रीनला स्क्रॅचपासून वाचवू शकतात. पण तुमचा फोन पडला तर हे गार्ड त्यांना सुरक्षित करू शकत नाहीत. स्मार्टफोनची स्क्रीन तुटली नाही तर नशीबच. दुसरीकडे २००० रुपये खर्चून येणारे स्क्रीन प्रोटेक्टर तुमच्या स्क्रीनचे संरक्षण करू शकतात. हे गार्ड तयार करताना उत्तम तंत्रज्ञानाचा वापर केला जातो. त्यांना अशा पद्धतीने बनवण्यात येते की, पडदा पडल्यावर स्क्रीनवर थेट दाब येत नाही. त्याचबरोबर यामध्ये वापरण्यात आलेली काच देखील सामान्यपेक्षा खूपच वेगळी असते आणि हेच त्यांची किंमत जास्त असण्याचे कारण असते.

# महत्त्वाचा कानमंत्र


- बोरे, अंजीर, पेरू यामध्ये अळ्या असण्याची शक्यता असते. म्हणूनच ही फळे धुवून, कापून खावीत.
- तेलकट कपडे धुताना पाण्यात साबणाबरोबर २-४ चमचे साखर टाकावी आणि त्यात कपडे भिजवावेत.



यामुळे तेलकटपणा लगेचच जातो.

- फ्रीज साफ करताना कोमट पाण्यात थोडा सोडा घालून मऊसर कपड्याने पुसून घ्यावा. यामुळे फ्रीज स्वच्छ होतो.
- सिल्कचे ब्लाऊज सौम्य शाम्पूने धुवावे. म्हणजे रंग जात नाही आणि खराबही होत नाही.
- केराच्या बादलीत थोडेसे फिनेल शिंपडून ठेवल्यास घाण वास येत नाही आणि त्याभोवती चिलटे घोंगावत नाहीत.
- केसांवर अथवा कपड्यांवर च्युइंगम चिकटले असल्यास त्यावर बर्फाचा खडा फिरवावा. यामुळे चिकटलेले च्युइंगम लगेचच निघते.

# रंगाला अनुसरून करा मेकअप



**गोऱ्या रंगासाठी :**

आपला रंग गोरा असेल तर ती निसर्गाकडून मिळालेली उत्तम देणगी आहे. पण जर गोरा असूनही आपला रंग काहीसा दबल्यासारखा वाटत असेल तर त्यावरही उपाय आहे. त्यात चमक आणण्यासाठी पीच वा शियर ब्रांझ ब्लशर लावायला हवा. तो नैसर्गिक रंगात राखू इच्छित असाल तर पेल पिंक रंगाची शेडही सोबत लावा. डोळ्यांना नेव्ही ब्ल्यू, सिल्व्हर ग्रे, सॉफ्ट पेस्टल, लायलॅक, स्काय ब्ल्यू, वा टेराकोटा रंग खूप शोभेल. तसेच न्यूड, बेबी पिंक, रोझी ब्राऊन व शिअर रोड लिपस्टिक वापरायला हवी.





**गडद रंगाच्या त्वचेसाठी :**

ब्लशरमध्ये डीफ प्लम, डार्क रोझ वा करेंट लावावे. डोळ्यांच्या सौंदर्यासाठी ब्राऊन मॅट, गोल्ड ब्रांझ वा सिल्व्हरची शिमरी शेड लावावी. लिपस्टिकसाठी ब्लॅक बेरी, पिच, डीफ रेड, पर्पल, कॅरेमल यापैकी कोणताही रंग निवडू शकता.

**पिवळ्या रंगाची त्वचा :**

या त्वचेवर लाल वा नारंगी रंगाचा वापर करू नये. ब्राऊनिश रोझ वा कोको ब्राऊन, डीफ पर्पल वा मिडलाईट ब्ल्यूऊआयशॅडो वापरावा. ओठ सुंदर दिसण्यासाठी रोझी बेझ, डीफ रेड वा शियर ब्राऊन यापैकी काहीही लावू शकतात.

**गव्हाळ त्वचेसाठी :**

या रंगाची रंगत वाढवण्यासाठी रोझ शेड वा म्युटेड टाऊनी ब्लशर वापरावा. ऑरेंज बेस कधीही लावू नये. डोळ्यांसाठी अर्थ टेन शेड म्हणजेच डार्क ग्रे, बेझ, मशरुम शेड वापरू शकता. ओठ नॅचरल दिसण्यासाठी शियर वा बेरी टिंटेड ग्लास लावावेत.

# डेंग्यूचा ताप या समस्या निर्माण करतो

डेंग्यूचा ताप हा एक व्हायरल एडीस इजिप्ती डासांनी पसरणारे संक्रमण आहे. असा ताप आला असता लगेच उपचार न केल्याने रुग्णाची परिस्थिती गंभीर होऊ शकते. यासाठी डेंग्यूचा उपचार वेळेवर करणे गरजेचे आहे. डेंग्यूच्या तापाने शरीरावर रक्ताचे डाग आणि डेंग्यू आघात सिंड्रोम सारखी लक्षणे निर्माण होऊ शकतात. यामुळे फुफ्फुस, यकृत आणि हृदयाला धोका निर्माण होतो.

**काय आहेत डेंग्यूच्या तापाची लक्षणे -**

- पोटात दुखणे
- नाक, तोंड आणि हिरड्यातून रक्तस्राव होणे
- रक्ताची किंवा सुकी उलटी होणे
- भूक कमी होणे
- थकवा येणे
- सांधे किंवा मांसपेशी दुखणे

**डेंग्यू आघाताचे सिंड्रोम-**

डेंग्यू आघात सिंड्रोममुळे त्वचेवर रक्ताचे छोटे डाग दिसतात आणि त्वचेच्या खाली रक्ताचे मोठे डाग दिसू शकतात.

- ब्लड प्रेशर कमी होते
- श्वास घेताना त्रास होतो
- थंड आणि चिकट त्वचा
- तोंड कोरडे पडते
- अस्वस्थता



# खाल्ल्या मिठाचे परिणाम

**खाल्ल्या** मिठाला जागावे असे आपले नीतीशास्त्र सांगते. सगळेच लोक खाल्ल्या मिठाला जागत नाहीत. पण मीठ मात्र याबाबतीत पक्के कृतज्ञ असते. जो जास्त मीठ खाईल त्याच्या शरीरात मीठ अगदी इमानदारीने आपले परिणाम दाखवतेच. एखादा पदार्थ थोडेसे जादा मीठ घालून खाल्ला तर बरा लागतो, परंतु हेच मीठ आपल्या शरीराचा शत्रू बनत असते. आपण कितीही दुर्लक्ष केले तरी मीठ आपला प्रताप दाखवतेच. अधिक मीठ खाल्ल्यामुळे उच्च रक्तदाबाचा त्रास होतो हे तर सर्वांना माहीतच झालेले आहे. म्हणून रक्तदाबाची तक्रार घेऊन एखादा पेशंट डॉक्टरकडे जातो तेव्हा डॉक्टर रक्तदाबाची गोळी तर देतातच पण मीठ कमी खाण्याचा सल्ला देतात.

ज्यादा मीठ खाल्ल्याने हृदयविकाराची शक्यता वाढते. त्याचबरोबर रक्तदाब वाढल्यामुळे आणि शरीराच्या हालचाली कमी झाल्यामुळे रोगप्रतिकारकशक्ती कमी होते. मिठातील सोडियममुळे मूत्रपिंडाच्या कार्यावरही परिणाम होतो. मूत्रपिंड हे शरीराच्या रक्तातील अशुद्ध घटक गाळून रक्ताला शुद्ध घटक मिळवून देणारा अवयव असतो. ते एक प्रकारचे फिल्टर असते.



मात्र हे फिल्टर मिठामुळे बाधित होते आणि फिल्टरचे काम म्हणावे तसे होत नाही. रक्तात अशुद्ध घटक मिसळले जातात आणि त्याचे वाईट परिणाम भोगावे लागतात. ज्यादा मीठ खाण्याने त्वचेवरही परिणाम होतात. त्वचा फुगायला लागते. म्हणजे चेहरा, हात, पाय, विशेषतः मनगट सुजल्यासारखे होते.

# व्यायामाचेही व्यसन नको

**शरीर** तंदुरुस्त राहण्यासाठी आणि मन मजबूत राहण्यासाठी व्यायाम करणे आवश्यकच आहे. व्यायामाच्या गरजेबाबत कोणाचेच दुमत होणार नाही. परंतु काही मानसशास्त्रज्ञ व्यायामाच्या बाबतीत एक इशारा देत आहेत की व्यायाम करा पण व्यायामाचे व्यसन लावून घेऊ नका. व्यायामाच्या अनावश्यक आहारी जाऊ नका.

दारू पिणारा माणूस जसा एडिक्ट होण्याची शक्यता असते तसेच व्यायाम करणाराही व्यायामाच्या बाबतीत एडिक्ट होण्याची भीती असते आणि म्हणून आपण व्यायाम करत आहोत की नाही हे तर पहाच पण आपण व्यायामाच्या बाबतीत व्यसन लावून घेत आहोत की काय यावरही लक्ष ठेवा, असे मानसशास्त्रज्ञांचे म्हणणे आहे.

शरीर तंदुरुस्त असले पाहिजेच, परंतु आपल्या दिवसातले सारे रुटीन केवळ त्यासाठीच्या व्यायामाच्या भोवती गुंफले जात असेल तर हा धोका संभवतो. जेव्हा आपण व्यायाम करतो तेव्हा शरीरातून एण्डॉर्फिन आणि सेरेटोनिन ही दोन द्रव्ये पाझरत असतात. त्यांचा उपयोग आपल्याला होत असतो. एण्डॉर्फिनमुळे मानसिक डिप्रेशन कमी होते तर सेरेटोनिनमुळे मनावरचा ताण कमी होतो. मात्र आपण या स्थितीच्या आहारी गेलो तर आपल्या स्नायूंमध्ये काही दोष निर्माण होण्याची शक्यता असते.



एवढेच नव्हे तर व्यायाम केल्याशिवाय पर्यायच नाही अशी स्थिती निर्माण होऊन एखादा दिवस व्यायाम बुडत असेल तर त्या दिवशीच्या त्या भावनेपोटी काही शारीरिक कटकटीही निर्माण होत असतात. तेव्हा एखादा दिवस व्यायाम केला नाही तर फार मोठे नुकसान होईल ही भावना मनातून काढली पाहिजे. व्यायामातून निर्माण होणारी शरीराची तंदुरुस्ती ही स्वागतार्हच असते.

परंतु आपल्या आयुष्याला परिपूर्णता येण्यासाठी एवढी एकच गोष्ट आवश्यक नाही.

व्यायामसुद्धा मोजकाच आणि नेमकाच करावा. परंतु काही लोकांच्या मनामध्ये असा गैरसमज असतो की जितका जास्त वेळ व्यायाम तेवढे आरोग्य उत्तम. वास्तविक हा गैरसमज आहे. शरीरसुद्धा एका विशिष्ट मर्यादेपर्यंतच तंदुरुस्त होत असते. त्या मर्यादेपर्यंत शरीर मजबूत होण्यासाठी जेवढा व्यायाम आवश्यक आहे तेवढाच व्यायाम केला पाहिजे. उगाच फार मोठी बॉडीबिल्डिंग होईल म्हणून अधिकाधिक वेळ जीममध्ये काढायला लागलो तर त्याचा फायदा तर होत नाहीच पण जीममधला तो अनावश्यक वेळ वाया जातो. ज्याचा इतर कामांवर विपरित परिणाम होण्याची शक्यता असते.

# उभे राहून पाणी प्यायल्याने होऊ शकतात 'हे' त्रास

**आपण** अनेकदा बाहेरून घरी आल्यानंतर किंवा खेळून आल्यानंतर उभे राहून घटाघटा पाणी पितो. ही सवय आपल्या आरोग्याला अपायकारक ठरू शकते. उभे राहून पाणी प्यायल्याने गॅसेसचा किंवा किडनीसंबंधी समस्या उद्भवू शकतात. त्यामुळे पाणी बसून प्यायलेले केव्हाही चांगले. बाहेरून दमून किंवा उन्हातून आल्यावर आपण घटाघटा पाणी पितो तेव्हा घरातील मोठ्यांकडून आपण ओरडा खातो. आता असे उभे राहून पाणी पिण्याचे कोणते त्रास होतात पाहूया...



**पचनाचे विकार -**

उभे राहून पाणी प्यायल्यास ते शरीरात अतिशय वेगाने खाली जाते. अशामुळे अन्ननलिकेवर ताण येतो आणि असे वारंवार झाल्यास पचन प्रक्रियेत समस्या निर्माण होण्याची शक्यता असते.

**किडनीचे विकार -**

उभे राहून पाणी प्यायल्यास ते शरीरातून वेगाने वाहून जाते. शरीरातील अनावश्यक घटक वाहून नेण्याचे काम पाण्याद्वारे केले जाते. मात्र, उभे राहून पाणी प्यायल्याने ही प्रक्रिया योग्य पद्धतीने होत नाही. यामध्ये किडनी आणि मूत्राशयातील अनावश्यक घटक तसेच राहतात. त्यामुळे मूत्रमार्ग किंवा किडनीत संसर्ग होण्याची शक्यता वाढते आणि किडनीचे विकार होण्याची शक्यता जास्त असते.

**सांधेदुखी -**

उभ्याने आणि घाईघाईने पाणी पिण्याची सवय आरोग्यासाठी धोकादायक आहे. अशाप्रकारे पाणी प्यायल्याने शरीराच्या सांध्यांतील द्रव पदार्थांचे संतुलन बिघडते त्यामुळे सांधेदुखीचा त्रास होण्याची शक्यता असते.

## मालवणीत भूमाफियांना राजाश्रय! बेकायदेशीर झोपडपट्ट्या

# अधिकाऱ्यांना हफ्ता दिला जात असल्याचा दावा

■ **बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

मालाड (पश्चिम) येथील दाट लोकवस्ती असलेला मालवणी परिसर मोठ्या प्रमाणावर शासनाच्या मालकीच्या जमिनीवर वसलेला आहे. यातील बहुतेक जमीन कलेक्टर लँड म्हणून तर काही भाग बीएमसीच्या ताब्यात असून अतिशय छोटा हिस्सा खासगी मालकीचा आहे. १,२०० एकरांवर पसरलेल्या या वस्तीमध्ये मोठ्या झोपडपट्ट्या, मध्यमवर्गीय घरे, चाळी आणि कारखान्यांचे प्रमाण मोठे आहे. एकेकाळी मोकळी असलेली ही जमीन गेल्या २५-३० वर्षांत हजारो बेकायदेशीर बांधकामांनी व्यापली गेली आहे. यापैकी अनेक बांधकामे राजकीय आणि प्रशासकीय संरक्षण मिळवणाऱ्या भूमाफियांनी उभारली व विकली असल्याचा आरोप आहे.

स्थानिक कार्यकर्त्यांच्या मते, सुरुवातीच्या काळात मालवणीत ४ हजार ते ५ हजार झोपड्या होत्या. पण गेल्या १० वर्षांत हा आकडा लाखोंमध्ये पोहोचल्याचा दावा केला जातो. अंबुजवाडीतील कलेक्टरच्या जमिनीवर जवळपास ३० हजार झोपड्या उभ्या राहिल्या आहेत. सर्व्हे नं. १ पासून मढ आयर्लंडपर्यंतचा प्रचंड भूभाग कलेक्टरच्या अखत्यारित असूनही बेकायदेशीर बांधकामे निर्बंधांविना सुरूच राहिली आहेत.

१,२०० एकरांवर पसरलेल्या मालवणी वस्तीमध्ये मोठ्या झोपडपट्ट्या, मध्यमवर्गीय घरे, चाळी आणि कारखान्यांचे प्रमाण अधिक आहे. एकेकाळी मोकळी असलेली ही जमीन गेल्या २५-३० वर्षांत हजारो बेकायदेशीर बांधकामांनी व्यापली गेली आहे. यापैकी अनेक बांधकामे राजकीय आणि प्रशासकीय संरक्षण मिळवणाऱ्या भूमाफियांनी उभारली व विकली असल्याचा आरोप आहे.

स्थानिक कार्यकर्त्यांच्या मते, सुरुवातीच्या काळात मालवणीत ४ हजार ते ५ हजार झोपड्या होत्या. पण गेल्या १० वर्षांत हा आकडा लाखोंमध्ये पोहोचल्याचा दावा केला जातो. अंबुजवाडीतील कलेक्टरच्या जमिनीवर जवळपास ३० हजार झोपड्या उभ्या राहिल्या आहेत. सर्व्हे नं. १ पासून मढ आयर्लंडपर्यंतचा भूभाग कलेक्टरच्या अखत्यारित असूनही बेकायदेशीर बांधकामे निर्बंधांविना सुरूच राहिली आहेत.

**सर्वात मोठे तिक्रमण...**

मालवणी परिसर नॉन-डेव्हलपमेंट झोन, मँग्रोव्ह पट्टा, सरकारी जमीन, गोडाऊन क्षेत्रे आणि मर्यादित खासगी भूखंड असा विविध जमिनीच्या श्रेणींमध्ये विभागला आहे. राठोडीसारख्या खासगी भागात लहान कंत्राटदारांनी बेकायदेशीर चाळी बांधल्याने समस्या गुंतागुंतीची आहे. १० हजार चौरस मीटरपेक्षा अधिक जमीन बेकायदेशीर ताब्यात असून ते पश्चिम उपनगरांतील मोठ्या अतिक्रमणांपैकी एक आहे.

**खरे बळी कोण?**

राजकीय, प्रशासकीय आणि विविध स्तर या प्रकरणात आहेत. खरे वास्तव म्हणजे मानवी संकटाचे आहे. लाखो रुपये घालून घर घेतलेल्या गरीब कुटुंबांचे पाडकामाच्या टप्प्यावर सर्वस्व उद्ध्वस्त होत आहे. बेकायदेशीर जाळे उभे करणारे दलाल, भूमाफिया आणि मधल्या एजंटांचे नेटवर्क मोठ्या प्रमाणात अबाधित आहे. प्रशासनाने फक्त रहिवाशांवर नव्हे, तर संपूर्ण भूमाफिया साखळीवर कारवाई केली नाही तर मालवणी हे अपयशी प्रशासन, पर्यावरणाचा विनाश आणि खोलवर रुजलेल्या भ्रष्टाचाराचे कायमस्वरूपी प्रतीक बनण्याचा धोका व्यक्त केला जात आहे.

**पर्यावरणीय नियमांकडे दुर्लक्ष!**

कार्यकर्ते फिरोज शेख यांच्या मते, मालवणीत भूमाफियांनी मँग्रोव्ह क्षेत्रात माती व डेब्रिज टाकून झाडे तोडून प्लॉट विकले आहेत. तक्रारी करूनही कलेक्टर व पालिकेने कारवाई केली नाही. राजकीय पक्षाचे थेट नेतृत्व गुंतले नसले तरी त्यांच्या कार्यकर्त्यांचा या रॅकेटमध्ये सहभाग आहे. काही बांगलादेशी नागरिकांना अटक झाली आहे. इथले बहुतेक रहिवासी हे उत्तर प्रदेश, बिहार, पश्चिम बंगाल आणि झारखंड येथील आहेत, असेही शेख म्हणाले.

**मतदारसंघाचा खेळ आणि प्रशासकीय अपयश?**

कार्यकर्ते सम्राट बागुल यांनी प्रशासनालाच जबाबदार धरले. सुरुवातीला कडक कारवाई केली असती तर अतिक्रमण एवढ्या प्रमाणात वाढले नसते. राजकारण्यांनी लोकांना रेशन व आधार कार्ड मिळवून देऊन मतदारसंघ तयार केला, असा त्यांचा आरोप आहे. ते म्हणाले की, मालवणीमध्ये झोपडवस्त्यांसोबतच बेकायदेशीर संरचनांमधून चालणाऱ्या एम्ब्रॉयडरीसारख्या अनियमित छोट्या उद्योगांचेही जाळे आहे.

**लहान खोल्या, मोठा घोटाळा**

भूमाफिया केवळ १० बाय १५ चौरस फूट खोलीदेखील ४ ते ६ लाख रुपयांना विकत असल्याचा आरोप आहे. कार्यकर्त्यांचे म्हणणे आहे की, प्रत्येक विभागाला 'हफ्ता' पोहोचतो. हजारो कुटुंबांनी – मुख्यतः मजूर व शहरी गरीब – आजीविका गुंतवून या छोट्या जागा खरेदी केल्या. आता अतिक्रमण हटविण्याचे अभियान सुरू झाले की, विक्रेते आणि भूमाफिया सुरक्षित राहतात, तर खरेदीदारांवर बेदखल, पाडकाम व कायदेशीर कारवाईचा डोंगर कोसळतो. अनेक झोपड्यांचे मालकत्व अनेकदा बदलले असून सध्याच्या रहिवाशांकडे कायदेशीर कागदपत्रे नसल्याचेही आढळते. अधूनमधून होणाऱ्या कारवाईनंतरही तात्पुरती बांधकामे करून खुलेपणाने विक्री सुरूच असल्याचा दावा आहे.

**सर्वाधिक मतदार!**


भाजप नेते विनोद शेलार म्हणाले, सर्वात मोठी सरकारी जमीन मालवणीत आहे. इथे मोठ्या संख्येने मुस्लिम समाज आणि काही रोहिंगे व बांगलादेशी लोक राहतात. मात्र कोणतेही सर्वेक्षण झाले नसल्याने खरा आकडा कळत नाही. काँग्रेसवर टीका करत त्यांनी दावा केला की, या पक्षाने मतपेढीसाठी झोपड्या व अतिक्रमणे वाढवली.

ते म्हणाले, २०२४ लोकसभा निवडणुकीनंतर विधानसभा निवडणुकीपूर्वी २६ हजार नवीन मतदारांची नोंद झाली. त्यापैकी १६ हजार मतदार मुस्लिम होते. साधारण ३.५ लाख मतदारांसह मालाड (पश्चिम)मध्ये सर्वाधिक मतदार झाले आहेत. त्यांनी आरोप केला की, मालवणी हे मादक पदार्थांचे केंद्र बनले आहे आणि अनेक बेकायदेशीर स्टुडिओ येथे चालतात. काही सरकारी अधिकारीही या रॅकेटमध्ये सामील असल्याचा त्यांनी आरोप केला.

**अतिक्रमण संपूर्ण मुंबईतच!**

आमदार अस्लम शेख म्हणाले, अतिक्रमण केवळ मालवणीत नाही तर ते संपूर्ण मुंबईतच आहे. जिल्हाधिकारी आणि मुंबई महानगरपालिकेने प्रथम नोटीस द्यायला हवी. पुरावा असल्यास अतिक्रमणे ओळखून कारवाई करावी. पुराव्याविना घरे-दुकाने पाडणे म्हणजे सत्तेचा गैरवापर आहे. प्रशासनाने रहिवाशांना रोहिंगे, बांगलादेशी किंवा पाकिस्तानी म्हणून लेबल लावून नोटीस न देता ४०० घरे पाडली. तरीही एकही बांगलादेशी किंवा पाकिस्तानी सापडला नाही. यावरून सरकारमध्येच मतभेद असल्याचे दिसते, अशी टीका शेख यांनी केली.

ते म्हणाले, रोहिंगे किंवा बांगलादेशी मालवणीत आले असतील आणि पोलिसांनी त्यांना अटक केली नाही तर ते सरकारचेच अपयश आहे. माझ्यावर आरोप करणाऱ्यांनी आधी पुरावे द्यावेत. मंत्री पुराव्याशिवाय माझ्यावर खोटे आरोप करत आहेत.






**सरकारची हालचाल सुरू**

मुंबई उपनगरचे पालकमंत्री व कौशल्य विकासमंत्री मंगल प्रभात लोढा यांनी संपूर्ण मुंबईतील ५०० एकर अतिक्रमित जमीन परत मिळवून सार्वजनिक वापरासाठी उपलब्ध करून देण्याची घोषणा केली होती. हे केवळ अतिक्रमणविरोधी पाऊल नसून वाढत्या सामाजिक व नागरी समस्यांवर उपाय असल्याचे त्यांनी म्हटले. मालाड-मालवणीची स्थिती विशेषतः चिंताजनक आहे, असे लोढा यांनी नमूद केले.

- प्रशासनाने मालवणीत ९ हजार चौरस मीटर अतिक्रमित जमीन मुक्त केली. मात्र लोढा यांनी, झोपडी हटवून चालणार नाही, पुन्हा अतिक्रमण होऊ नये याची खबरदारी घ्यावी, असे आदेश दिले. त्यांनी मालवणीत रोहिंगे व बांगलादेशी नागरिक असल्याच्या तक्रारीही मांडल्या आणि स्थानिक काँग्रेस आमदार अस्लम शेख यांच्यावर बेकायदेशीर बांधकामांना प्रोत्साहन दिल्याचा आरोप केला.
- मुंबई आंतरराष्ट्रीय शहर आहे आणि दहशतवादी संघटनांच्या रडारवर असते. संवेदनशील भागातील अनधिकृत वस्ती सुरक्षेसाठी धोकादायक आहेत, असे लोढा यांनी म्हटले आहे. त्यांनी पोलीस आयुक्तांकडे तक्रार देत आमदार शेख यांनी बेकायदेशीर रोहिंगे/बांगलादेशी वस्ती व बेकायदेशीर बांधकामांवरील कारवाईबद्दल धमकी दिली, असा आरोप केला आहे.

"बेकायदेशीर झोपडपट्ट्या आणि अतिक्रमणांसाठी काँग्रेस जबाबदार आहे. त्यांचे लोक मतांच्या राजकारणासाठी या बेकायदेशीर कामांमध्ये सहभागी आहेत."

**विनोद शेलार, भाजप नेते**

"केवळ मालवणीमध्येच नाही तर संपूर्ण मुंबईत अतिक्रमणे आहेत. अतिक्रमणांसाठी मी जबाबदार आहे किंवा मी अधिकाऱ्यांना धमकावले आहे, असा आरोप करणाऱ्यांनी आधी पुरावे सादर करावेत."

**अस्लम शेख, काँग्रेस आमदार**

## विधानभवनातील हाणामारी भोवणार

### दोघांना तुरुंगवास देण्याची शिफारस, चौकशी समितीचा खुलासा

■ **नागपूर। प्रतिनिधी,**

जुलैला पावसाळी अधिवेशनात गोपीचंद पडळकर आणि जितेंद्र आव्हाड यांच्या समर्थकांमध्ये हाणामारी झाली होती. पडळकरांचे समर्थक ऋषीकेश टकले आणि आव्हाडांचे समर्थक नितीन देशमुख हे थेट विधीमंडळाच्या लॉबीत भिडले होते, दरम्यान या प्रकरणी शिस्तभंग समितीकडून त्यांना जेलमध्ये टाकण्याची शिफारस करण्यात आल्याची माहिती आहे. पाहुयात यासंदर्भातला आमचा हा स्पेशल रिपोर्ट. पावसाळी अधिवेशनात ऋषीकेश टकले आणि नितीन देशमुखांमध्ये झालेली हाणामारी त्यांना चांगलीच भोवण्याची शक्यता आहे. विधीमंडळाच्या शिस्तभंग समितीकडून दोघांना तुरूंगवास देण्याची शिफारस करण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिलीय. जितेंद्र आव्हाड आणि गोपीचंद पडळरांमध्ये झालेल्या वादावरून दोन्ही नेत्यांचे समर्थक थेट विधिमंडळाच्या लॉबीमध्ये भिडले होते. दरम्यान या प्रकरणात त्यांच्यावर कठोर कारवाई होण्याची शक्यता आहे.

**विधिमंडळ परिसरात शिवीगाळ**

१७ जुलैला आव्हाड आणि पडळकरांच्या समर्थकांमध्ये हाणामारी झाली होती. मात्र, त्याआधी पडळकर आणि आव्हाडांमध्ये टोकाची लढाई पाहायला मिळाली होती. १५ जुलैला गोपीचंद पडळकर बाजून जात असताना जितेंद्र आव्हाड मंगळसूत्र चोर असं म्हणाल्याचं पाहायला मिळालं होतं. तर दुसऱ्या दिवशी म्हणजेच १६ जुलैला पडळकर आणि आव्हाडांमध्ये विधिमंडळ परिसरात शिवीगाळ झाली आणि त्याच्या दुसऱ्या दिवशी म्हणजेच १७ जुलैला दोन्ही नेत्यांमधल्या वादाचं रूपांतर हाणामारीत झालं, मात्र, ही हाणामारी दोन्ही नेत्यांच्या समर्थकांमध्ये झाल्याची पाहायला मिळाली.







**विधानभवनाच्या लॉबीत झालेली हाणामारी भोवणार**

या हाणामारीतनंतर जितेंद्र आव्हाडांनी पडळकरांवर गंभीर आरोप केला होता, मला मारण्यासाठीच ती लोक आल्याचा दावा आव्हाडांनी केला होता. तर दुसरीकडे झी २४ तासच्या टू द पॉईंट कार्यक्रमामध्ये गोपीचंद पडळकरांनी देखील या प्रकरणावर रोखठोक भूमिका मांडली होती. नितीन देशमुखांनी माज्याकडे वाकड्या नजरेनं बघितलं.. त्यामुळे त्यांचा मार खाऊन घेऊ का? असा सवाल पडळकरांनी केला होता. दरम्यान या हाणामारीच्या घटनेनंतर महाराष्ट्राच्या राजकीय संस्कृतीला गालबोट लागलं होतं. या प्रकरणाची विधीमंडळाच्या शिस्तभंग समितीनं गांभीयार्नं दखल घेतलीय. विधीमंडळाच्या लॉबीत हाणामारी करणाऱ्यांना तुरुंगवास देण्याची शिफारस करण्यात आल्याची माहिती आहे, त्यामुळे दोन्हीही नेत्यांच्या समर्थकांना हे प्रकरण चांगलंच भोवणार यात शंका नाही.

## महाराष्ट्रात भीक मागण्यास प्रतिबंध

### गोंधळाच्या वातावरणात परिषदेतही विधेयक मंजूर

■ **नागपूर। प्रतिनिधी,**




महाराष्ट्रात भीक मागण्यास आळा घालण्यासाठी तयार करण्यात आलेले महत्वाचे विधेयक विधानसभेत मंजूर करण्यात आल्यानंतर बुधवारी (१० डिसेंबर) विधान परिषदेत गोंधळाच्या वातावरणात हे विधेयक मंजूर करण्यात आले. सभागृहातील अनेक सदस्यांनी या विधेयकाबाबत असमाधान व्यक्त केले. तसेच विधेयक मंजूर झाल्यानंतरही संबंधित बाबींचा पुनर्विचार करण्याची भूमिका काही सदस्यांनी मांडली आहे. त्यामुळे आता या विधेयकाबाबत पुढील दिशा दाखवण्यासाठी सभापतींच्या दालनात 13 डिसेंबर रोजी महत्त्वाची बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीत विधेयकातील विसंगती, सदस्यांच्या सूचना आणि पुढील प्रक्रिया यावर चर्चा होणार आहे.

महाराष्ट्रात भीक मागण्यास प्रतिबंध करणारे विधेयक मंजूर विधानसभेत मंजूर झाल्यानंतर आज मंत्री अदिती तटकरे यांनी हे विधेयक विधान परिषदेत मांडले. मात्र, अनेक सदस्यांनी विधेयकातील शब्दप्रयोग, त्याचा उद्देश आणि स्पष्टीकरणात असलेले विसंगतीचे मुद्दे उपस्थित केले. त्यामुळे या विधेयकाच्या मंजुरीची पद्धत आणि त्यावर झालेल्या मर्यादित चर्चेवर अनेकांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. त्यामुळे विधान परिषदेत हे विधेयक मांडल्यानंतर लगेचच वातावरण तापले.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार एकनाथ खडसे यांनी म्हटले की, ह्यमहारोगीह्ल हा शब्द शैलीतून वगळण्यात आला असला, तरी या विधेयकाच्या शीर्षकात आणि मजकुरात असलेल्या ताळमेळाच्या अभावाकडे लक्ष वेधले. तर शिवसेना शिंदे गटाच्या आमदार मनीषा कायंदे, राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार अमोल मिटकरी आणि उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी विधेयकाबाबत थेट नाराजी दर्शवली. विशेषतः विधेयकाच्या शीर्षकात बदल करण्याची गरज असल्याची मागणी करण्यात आली.



**नेमकं काय घडलं?**

मुंबईतील मरीन ड्राईव्ह परिसरातील एक उच्चभ्रू कुटुंब दुबईत राहत होते. तर त्यांची ९२ वर्षीय आई मुंबईतील घरी वास्तव्यास होती. घरात तीन कायमस्वरूपी नोकर आणि एक साफसफाई कामगार असे चार जण कामाला होते. याच काळात एप्रिल ते जुलै २०२५ या तीन महिन्यांच्या काळात त्यांच्या घरात चोरी झाली. दुबईतून परतल्यावर त्यांना कपाटातील लॉकरमधून १४३७ ग्रॅम वजनाचे साधारण ३ कोटी ५६ लाख रुपये किंमतीचे सोने-डायमंडचे दागिने चोरीला गेल्याचे निदर्शनास आले. परंतु, घरात सीसीटीव्ही नसल्यामुळे आणि कुटुंबिय बाहेर असल्याने चोरीची नेमकी तारीख निश्चित करता येत नव्हती. लाखो रुपयांची चोरी झाली. पण काहीही माहिती नव्हती. त्यामुळे मरीन ड्राईव्ह पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपींविरोधात गुन्हा दाखल झाला. साधारण ८ महिने पोलीस या प्रकरणाचा तपास करत होते. वरिष्ठ पोलीस निरीक्षक निलेश बागूल यांच्या मार्गदर्शनाखाली प्रदीप चौधरी यांच्या पथकाने संपूर्ण प्रकरणाचा बारकाईने अभ्यास केला.

## मुंबईतील सर्वात मोठया घरफोडीचा पर्दाफाश

### ना पुरावा, ना सीसीटीव्ही, फक्त...

■ **ठाणे। प्रतिनिधी,**

मुंबईतील मरीन ड्राईव्ह परिसरातून तब्बल ३.५६ कोटी रुपयांचे सोने-डायमंडचे दागिने चोरीला गेल्याच्या घटनेने खळबळ उडाली होती. या हायप्रोफाईल चोरीचा तब्बल ८ महिन्यांनी छडा लागला आहे. पोलिसांच्या अथक तपासानंतर ही चोरी कोणी केली, याची माहिती उघडकीस आली आहे. धक्कादायक बाब म्हणजे, घरात तात्पुरती काम करणाऱ्या मोलकरणीनेच हा लाखोंचा ऐवज लंपास केल्याचे समोर आले आहे. मरीन ड्राईव्ह पोलिसांनी या प्रकरणी आरोपी महिलेला कल्याणमधून अटक केली असून तिच्याकडून १ कोटी २७ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

**आरोपी सापडला**

यावेळी पोलीस पथकाने घरातील सर्व नोकर आणि संबंधित साक्षीदारांची कसून चौकशी केली. त्यांना मिळालेल्या माहितीचा आणि तांत्रिक पुराव्यांचा धागा पकडत पोलिसांनी हळू हळू तपास केला. अखेरीस, पोलिसांना अर्चना सुनिल साळवी (४४) या महिलेबद्दल माहिती मिळाली. ही महिला मे २०२५ मध्ये केवळ काही दिवसांसाठी फिर्यादींच्या आईची काळजी घेण्यासाठी तात्पुरती मोलकरीण म्हणून कामावर आली होती.

पोलिसांनी अर्चना साळवी हिला ताब्यात घेऊन कसून चौकशी केली. त्यानंतर अर्चनाने या गुन्ह्याची कबुली दिली. फिर्यादींच्या गैरहजेरीत आणि वृद्ध आई घरी असताना केवळ काही दिवसांसाठी कामावर आलेल्या या मोलकरणीने अत्यंत चलाखीने घरात प्रवेश मिळवला. त्याच काळात तिने कोट्यवधींचे दागिने चोरले आणि कोणालाही संशय येऊ न देता ती कामावरून निघून गेली. आठ महिने कोणालाही याचा थांगपत्ता लागला नाही.

पोलिसांनी आरोपी अर्चना साळवीला अटक केली आहे. तिच्याकडून तब्बल १२४९ ग्रॅम सोन्या-डायमंडचे दागिने जप्त करण्यात आले आहेत, ज्यांची किंमत १ कोटी २७ लाख ३१ हजार रुपये आहे. चोरीचा हा एवढा मोठा ऐवज अर्चनाने एकटीने चोरला की यात आणखी कोणाचा सहभाग आहे, तसेच तिने चोरी नेमकी कशी केली आणि उर्वरित ऐवज कुठे दडवला आहे, याचा कसून तपास मरीन ड्राईव्ह पोलीस करत आहेत.

**तरुणीवर पुन्हा हल्ला...**

या प्रकरणात न्यायालयीन कोठडीत असलेल्या गौरवने जामीन मिळण्यासाठी न्यायालयात अर्ज केला. त्याला सरकारी वकील जावेद खान आणि तक्रारदार तरुणीचे वकील ॲड. खंडेराव टाचले यांनी विरोध दर्शविला. आरोपीने नियोजनबद्ध पद्धतीने तरुणीवर जीवघेणा हल्ला केला असून, त्याची पार्श्वभूमी गुन्हेगारीची आहे. त्याला जामीन मंजूर झाल्यास तो तरुणीवर पुन्हा हल्ला करून साक्षीपुराव्यात छेडछाड करू शकतो, असा युक्तिवाद सरकारी वकील आणि तक्रारदार तरुणीच्या वकिलांनी केला. तो ग्राह्य धरत न्यायालयाने आरोपीचा जामीन फेटाळला.

## ब्रेकअपनंतर गर्लफ्रेंडवर तीनवेळा गोळीबार, पण पिस्तुल लॉक

### डिलिव्हरी बॉयच्या गणवेशात... बॉयफ्रेंडला कोर्टाचा दणका

■ **पुणे। प्रतिनिधी,**

बाणेरमध्ये प्रेमसंबंधांना झिडकारल्याच्या रागातून प्रेयसीवर पिस्तुलातून गोळीबाराचा प्रयत्न करणाऱ्या आरोपी प्रियकराचा जामीन अर्ज पुणे न्यायालयाने फेटाळला. डिलिव्हरी बॉयच्या गणवेशात आलेल्या या तरुणाचे पिस्तुल लॉक झाल्याने तरुणी बचावली होती. 'गुन्ह्याचे गंभीर स्वरुप आणि पुरावे लक्षात घेता; तसेच तक्रारदार तरुणीच्या जिवाला धोका निर्माण होण्याची शक्यता पाहता, आरोपीला नियमित जामीन देता येणार नाही,' असा आदेश अतिरिक्त सत्र न्यायाधीश एम. जी. चव्हाण यांनी दिला.

गौरव महेश नायडू (वय २५, रा. पिंपरी-चिंचवड) असे जामीन फेटाळलेल्या आरोपीचे नाव आहे. त्याच्याविरोधात २४ वर्षीय पीडितेने बाणेर पोलिस ठाण्यात तक्रार दिली होती. ही घटना २९ ऑगस्ट रोजी सकाळी पावणेदहाच्या सुमारास बाणेर येथील एका खासगी प्रशिक्षण संस्थेच्या आवारात घडली. तक्रारदार तरुणी 'एमबीए'चे शिक्षण घेत असून, एका खासगी संस्थेत कौशल्य विकासाचे प्रशिक्षण घेत होती. दोन वर्षांपूर्वी तिची एका मित्राच्या माध्यमातून गौरवशी ओळख झाली. त्यांच्या मैत्रीचे रुपांतर प्रेमसंबंधात झाले. मात्र, गौरवविरोधात खुनाचा प्रयत्न केल्याप्रकरणी २०२१ मध्ये वाकड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल असून तो येरवडा कारागृहात असल्याचे कळल्यावर तिने त्याच्याशी बोलणे बंद केले. त्यामुळे गौरवने संतापून तिच्यावर पिस्तुलातून तीन वेळा गोळीबार करण्याचा प्रयत्न केला. मात्र, पिस्तुलातून गोळ्या न सुटल्याने तिचा जीव वाचला. तरुणीने आरडाओरडा केल्यानंतर गौरव दुचाकीवरून पसार झाला. पोलिसांनी खडकी रेल्वे स्थानकाजवळ गौरवला पकडले असता, त्याच्या दुचाकीच्या डिक्कीतून देशी देशी बनावटीचे पिस्तूल आणि तीन जिवंत काडतुसेही जप्त करण्यात आली.

## महिला शिक्षिका ३ शिक्षकांसोबत आक्षेपार्ह स्थितीत, शिपायाच्या लक्षात आलं अन्...

■ **मुंबई। प्रतिनिधी,**

वासुदेव मिश्रा हायस्कूलमधील परिचारिका नीलम देवी बुधवारी सकाळी १० वाजता गंभीर जखमी अवस्थेत डीएमसीएचमध्ये आल्यानंतर एकच खळबळ माजली. नीलम देवी त्यांनी आरोप केला की शिक्षिका, त्यांचे सहकारी संजय पासवान, रवी नंदन कुमार आणि राहुल कुमार हे कार्यालयात अश्लील कृत्ये करत होते. त्यांनी याबद्दल आक्षेप घेतला तर त्यानंतर शिक्षिकासह तिघांनी हल्ला केला. या हल्ल्यात जखमी झाल्याचे तिने सांगितले.



बिहारमधील सिमरी इथल्या वासुदेव मिश्रा हायस्कूलमध्ये परिचारिका म्हणून काम करणाऱ्या नीलम देवी बुधवारी गंभीर जखमी अवस्थेत डीएमसीएचच्या आपत्कालीन कक्षात आली. ही घटना सकाळी १० वाजताच्या सुमारास सिमरी पोलीस स्टेशन परिसरातील शाळेच्या कॅम्पसमध्ये घडली आहे.

जखमी नीलम देवी यांनी आपल्या जबाबात म्हटलंय की, शाळेतील शिक्षिका बुधवारी ऑफिस रूममध्ये तिच्या सहकारी शिक्षक संजय पासवान, रवी नंदन कुमार आणि राहुल कुमार यांच्यासोबत अश्लील कृत्ये करत होती. या चौघांमध्ये प्रेमसंबंध होते. जेव्हा त्यांनी निषेध केला त्या चौघांना म्हटलं की, शाळेच्या आवारात शिक्षकांना अशा कृती करणे शोभत नाही. या कृत्याचा विद्यार्थ्यांवर नकारात्मक परिणाम होईल. जर तुम्हाला काही करायचे असेल तर ते शाळेबाहेर करा. यानंतर तेव्हा सर्व शिक्षकांनी एकत्र येऊन त्यांच्यावर हल्ला केला.

पीडितेच्या म्हणण्यानुसार, शिक्षिकेने तिच्या डोक्यावर लोखंडी रॉडने मारले ज्यामुळे तिचे हाड फ्रॅक्चर झाले. इतर शिक्षकांनी तिला चापट मारली, लाथा मारल्या आणि मुक्का मारल्या आणि नंतर तिचे केस धरून जमिनीवर फेकले. हल्ल्यानंतर ती बेशुद्ध पडली होती.

ग्रामस्थ आणि शिक्षकांच्या तक्रारींनंतर शाळेत आलेले जिल्हा शिक्षण अधिकारी के.एन. सदा म्हणालं की, अध्यापन आणि शिक्षण सुनिश्चित करण्यासाठी परिचारिकांनी एकमेकांशी समन्वय साधावा आणि ही अनुशासनही खपवून घेतली जाणार नाही. जिल्हा शिक्षणाधिकारी यांनी असेही सांगितलं की ते परिचारिकांकडून स्पष्टीकरण मागतील.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मंदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४०००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com